रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३४० । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## हिराकोट तलावाची भिंत कोसळली

**अलिबाग :** शहरातील हिराकोट तलावाच्या संरक्षक भिंतीचा काही भाग कोसळला आहे. गेल्या काही दिवसांपासून सदरची भिंत कोसळलेल्या स्थितीमध्ये आहे. नगरपालिका प्रशासनाने तातडीने यांची दुरुस्ती करावी अशी मागणी जोर धरत आहे. हिराकोट तलावामध्ये काहीच महिन्यांपूर्वी सुशोभिकरण करण्यात आले होते. तलावात कारंजेदेखील बसवण्यात आले आहेत. अलिबागमध्ये पर्यटक मोठ्या संख्येने येतात. त्यावेळी ते आवर्जून हिराकोट तलावाला भेट देतात.

रायगड, शुक्रवार, दि. १७ मे २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## आज कुरुळ-उसर वाहतूक बंद

**रायगड :** अलिबाग तालुक्यातील गेल कंपनीकडून कुरुळ ते उसर अशी सेलची वाहतूक करण्यात येणार आहे. त्यामुळे कुरुळ ते कंपनीपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतूक बंदी केली आहे. १७ मे २०२४ रोजी सकाळी ३ ते सकाळी ८ वाजेपर्यंत वाहतूक बंद करण्याबाबतची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

यावेळी पर्यायी मार्ग म्हणून रोहा ते अलिबाग बाजूकडे येणाऱ्या सर्व वाहनांना वावेफाटा-चौलनाका-नागाव-सहाण बायपासमार्गे बेलकडे फाटा ते अलिबाग मार्ग तसेच पान ५ वर

**आजचा अग्रलेख**

**कांदे आणि जय श्रीराम**

## वेधक

### अज्ञात चोरट्यांनी फोडले एटीएम

**नेरळ :** अवकाळी पावसामुळे नेरळ शहरात गेली दोन दिवस विद्युत पुरवठा खंडित झाला. या अंधाराचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी आयसीआयसीआय बँकेचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला. या मधून चोरट्यांना पैसे चोरता आले नाही. कर्जत तालुक्याला मागील काही दिवस अवकाळी पावसाने झोडपून काढले होते. नेरळ शहरात या अवकाळी पावसामुळे ठिकठिकाणी महावितरणाचे विद्युत खांब कोसळून पडल्याने शहर गेली दोन दिवस अंधारात आहे. बुधवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास अंधारात नेरळ शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेले सागर इलेट्रिकल स्टोअरजवळील आयसीआयसीआय पान ५ वर

### नाट्यगृहासाठी कलाकार रस्त्यावर

**मुंबई :** मुंबईतील १०० वर्षांचा इतिहास असलेले नाट्यगृह वाचवण्यासाठी आता रंगकर्मी सरसावले आहेत. परळसारख्या मराठमोळ्या भागात असलेले दामोदर नाट्यगृह वाचवण्यासाठी आता अभिनेते-निर्माते आणि अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी कलाकारांसह उपोषणाचा इशारा दिला आहे. मुंबईतील परळ येथे असणारे सोशल सर्व्हिस लीगचे दामोदर नाट्यगृह १ नोव्हेंबर २०२३ पासून पुनर्बांधणीच्या कारणांनी बंद आहे. या ऐतिहासिक नाट्यगृहाच्या जागी खासगी शाळेची वास्तू उभारण्याचा प्रस्ताव आहे. याविरोधात नाट्यकर्मींमध्ये नाराजी आहे. नाट्यगृह आहे त्याच जागी तब्बल ९०० आसन पान ५ वर

### मनोज जरांगे यांची सभा रद्द

**बीड :** मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी दोन मोठे निर्णय जाहीर केले. मनोज जरांगे पाटील यांची ८ जून रोजी बीडच्या नारायणगड येथे होणारी सभा तुर्त रद्द केली आहे. या सभेच्या आधी ४ जूनपासून मनोज जरांगे पाटील उपोषण करणार होते. परंतु आता सभा रद्द झाल्यामुळे उपोषणाची नवीन तारीख जाहीर करण्याचा दुसरा निर्णय मनोज जरांगे पाटील यांनी घेतला आहे. सभा पुढे ढकल्यामुळे आता ४ जून पूर्वी उपोषण सुरू करणार असल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे.

बीडच्या केज तालुक्यातील नांदुर घाट येथे झालेल्या दगडफेकीत मराठा समाज बांधव जखमी झाले आहेत. पान ५ वर

# ४ तारखेला देशात करणार ‘डिमोदीनेशन’

- उद्धव ठाकरे यांचे टीकास्त्र
- पंतप्रधान म्हणून महाराष्ट्रात मोदींच्या शेवटच्या सभा

**। कल्याण । वृत्तसंस्था ।**

काही वर्षांपूर्वी डिमॉनिटायझेन केलं होतं, तसं चार तारखेला आम्ही डिमोदीनेशन करणार आहोत. पंतप्रधान म्हणून या तुमच्या शेवटच्या सभा आहेत. कारण ४ तारखेला भाजपची सत्ता जाणार आहे. डोंबिवली हे विद्येचे माहेर घर आहे. मला नकली संतान म्हणतात तुम्हाला मान्य आहे का?, असे ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. कल्याणमध्ये ठाकरेंच्या उमेदवार वैशाली दरेकर राणे यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरेंची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर महाराष्ट्राचे वैभव परत आणणार आहोत. गोहत्या पान ५ वर



### मोदी सरकार नाही तर गजनी सरकार

उद्धव ठाकरे म्हणाले, आज यांचे तळ्यात मळ्यात कुणाच्या तरी गळ्यात अशी भाजपची अवस्था आहे. मला नकली संतान म्हणायचं आणि दुसऱ्या दिवशी मला डोळा मारतात. तिसऱ्या दिवशी परत नकली शिवसेना म्हणायचं. मी माणूसकी सोडलेली नाही. पण दहा वर्ष या माणसाने झोप घेतलेली नाहीये. मी सरकारला मी मोदी सरकार नाही तर गजनी सरकार म्हणत आहे.

### महाराष्ट्राचे वैभव, गुजरातला नेलं

मी चपराशी झालो तरी चालेल पण मी पुन्हा येईल, अशी देवेंद्र फडणवीसांची अवस्था आहे. महाराष्ट्र लुटला जातोय तरी मिंधे दिल्लीश्वरांची चाकरी करतात. तुम्हाला वचन दिलयं, महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीचे सरकार येणार आहे. महाराष्ट्राचे वैभव यांनी गुजरातला नेलं आहे. ते परत आणणार आहे. मोदींना महाराष्ट्राबद्दल कळवळा आलाय, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

# इंडियाच्या फिल्डींगने चिंता वाढवली

## मुस्लिम मतांची महायुतीला अपेक्षा

**आविष्कार देसाई**

**। रायगड ।**

लोकसभा मतदार संघातील मुस्लिम बहुल पट्ट्यातील मत्ताधिक्य मिळेल अशी अपेक्षा भाजपासह महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना आहे. परंतू आधीच तगडी फिल्डींग लावल्याने अनंत गीते येथून मुसंडी मारतील असा विश्वास इंडिया आघाडीला आहे. ४ जून रोजी निकाल जाहीर होणार असल्याने खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

सुनील तटकरेंपेक्षा भाजपाने रायगड लोकसभेची निवडणूक अधिक प्रतिष्ठेची केली होती. त्यामुळे इंडिया आघाडीच्या घटक पक्षातील महत्वाच्या नेत्यांनी प्रचारात चांगलाच धुरळा उडवला. गेल्या पाच वर्षात कोणती विकास कामे करण्यात आली. याबाबत भाजपा आणि तटकरे बोलले नाहीत. बेरोजगारी, महागाई, रेल्वेचा प्रश्न, रखडलेला महामार्गाचा प्रश्न यावर महायुतीच्या नेत्याने ठोस काही करणार असल्याचे सांगितले नाही.

मोदी सरकार हे कष्टकरी, शेतकरी, तरुण, दलीत, मुस्लिम यांच्या विरोधात असल्याचे विविध धोरणातून स्पष्ट झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेनेचे पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे, शेकापचे नेते आमदार जयंत पाटील, काँग्रेसचे नेते नसिम खान यांच्यासह अन्य नेते मतदारांच्या मनात हाच मुद्दा बिंबवण्यात यशस्वी झाले होते.

भाजपाच्या कार्यप्रणालीमुळे मराठा, ओबीसी, दलीत आणि मुस्लिम समाजात कमालीची नाराजी होती. या घटकांबरोबर मुस्लिम समाजामध्ये मोदी राजवटीची चांगलीच दहशत निर्माण झाली होती. त्यामुळे मोंदींना पुन्हा सत्तेवर येण्यापासून रोखणे गरजेचे असल्याचे त्यांनी मुस्लिम पान ५ वर

# वादळी वाऱ्यात शरद पवारांचे भाषण

## व्यासपीठावर बॅनर कोसळला, सुदैवाने दुर्घटना टळली

**। नाशिक । वृत्तसंस्था ।**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आज नाशिक लोकसभा मतदारसंघातील सटाणा येथे जाहीर सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ. शोभाताई बच्छाव यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची सटाणा सभा सुरू असताना सोसाट्याचा वारा सुरू झाला. मात्र, तरीही पवारांनी आपलं भाषण सुरूच ठेवलं होतं. मात्र, यावेळी, व्यासपीठावरील बॅनर कोसळल्याची घटना घडली.

सुदैवाने या दुर्घटनेत कुणालाही जखम झाली नाही. व्यासपीठावर जे कार्यकर्ते होते, त्यांनी हा बॅनर वरचेवरच घेतल्याने अनर्थ टळला. मात्र, बॅनर कोसळल्याची घटना समजाच शरद पवारांनी आपले भाषण उरकते घेतले.

विधानसभेत शेतकऱ्यांचे प्रश्न, या भागातील प्रश्न मांडले जायचे. उत्तम शेती कशी करायची हे या भागातील शेतकऱ्यांनी दाखवून दिले. नाशिकचा नावलौकिक त्यामुळेच सर्वत्र वाढल्याचे सांगत शरद पवारांनी सटाण्यातील भाषणाला सुरुवात केली. देशात सध्या मोदी राज्य आहे.विविध जिल्ह्यात आज कांद्याचा प्रश्न महत्वाचा आहे. मात्र, कांद्याची निर्यात केंद्र पान ५ वर

# ईडीला अटकेचे अधिकार नाहीत

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ईडीला आरोपींना ताब्यात घ्यायचे असेल तर आधी संबंधित न्यायालयात अर्ज करावा लागेल. त्यानंतर या अर्जावर समाधान झाल्यानंतरच न्यायालय आरोपीची कोठडी ईडीला देऊ शकेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती अभय एस. ओक आणि उज्वल भुयान यांच्या खंडपीठाने पंजाबमधील एका प्रकरणात गुरुवारी हे निर्देश दिले आहेत.

याचिकाकर्त्याने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या डिसेंबर २०२३ च्या आदेशाला आव्हान दिले होते. विशेष न्यायालयाने गुन्ह्याची दखल घेतली असतानाही मनी लॉन्ड्रिंग प्रकरणातील पान ५ वर

# खोराबंदर जेट्टी पूर्णत्वाच्या मार्गावर




(छायाचित्र : सुधीर नाझरे)

**। मुरूड । प्रतिनिधी ।**

गृह व बंदर विभागाने ६ एप्रिल २०२२ मध्ये खोरा बंदरातील जुन्या जेट्टीला पर्याय म्हणून नव्या प्रवासी जेट्टीची उंची व लांबी वाढवण्यासाठी १११ कोटी २६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

तसेच जेट्टीला आवश्यक असणाऱ्या सुविधा पुरविण्यासाठी देखिल अतिरिक्त निधी प्रदान करण्यात आला होता.सदर जेट्टीचे काम ऑक्टोबर २०२३ मध्ये सुरु करण्यात आले असून आजमितीला काम प्रगती पथावर असून ऑक्टोबर २०२४ अखेर हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

खोराबंदरातून ऐतिहासिक जंजिऱ्यावर जाण्यासाठी पर्यटकांच्या सुविधेसाठी या जेट्टीचा चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकेल असा विश्वास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

सध्या या जेट्टीचे काम जोरदार सुरु असून सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा मानस संबंधित ठेकेदाराने व्यक्त केला आहे. पूर्वी अस्तित्वात असलेल्या जुन्या जेट्टीचा वापर करताना समुद्र ओहटीच्यावेळी प्रवासी वाहतूक करणे होडी चालकांना तसेच प्रवाशांना अडचणीचे होत असे. म्हणून या नवीन कामास तातडीने निधी मंजूर करण्यात आला होता. नव्याने उभारल्या जाणाऱ्या जेट्टीचे बांधकाम सुमारे १५० मीटर पाण्याच्या आत केले जाणार असून लांबी वाढवण्यात आली आहे. विशेष म्हणजे ओहटीच्यावेळी प्रवासी बोटींचा खोळंबा होणार नाही. आणि निर्वेधपणे किल्ल्यात जाणे सुकर होणार आहे.

३५० वर्षापूर्वी बांधलेल्या ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर प्रतिवर्षी राजपुरी आणि खोरा बंदरातील जेट्टीवरून ६ ते ७ लाख हौशी पर्यटक हजेरी लावत असून प्रति प्रवासी मेरी पान ५ वर



• ३१ मे पासून मासेमारी बंद करण्याचे आदेश आल्याने आणि हवामान खात्याने दिलेल्या वादळ वाऱ्याच्या इशाऱ्याने कोळी बांधवांनी आपल्या बोटी किनाऱ्यावर घेण्यास सुरुवात केली आहे.अलिबाग बंदरात क्रेनच्या सहाय्याने मासेमारी बोटी किनाऱ्यावर आणल्या जात आहेत. (छायाचित्र : समीर मालोदे)

# मित्रानेच केली मित्राच्या मुलाची हत्या

**। उरण । वार्ताहर ।**

आपल्या मित्राच्याच दहा वर्षीय मुलाचे अपहरण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना उरणमध्ये घडली आहे.

उरण तालुक्यातील चिर्ले गावात राहणाऱ्या बिंदू राम अजोर (वय ३३) यांनी मोठ्या विश्वासाने आपल्या मुलाला शेजारीच राहणाऱ्या कांताराम सिताराम यादव याच्यासोबत घरी पाठवले.बिंदू राम हे पत्नी आणि एकुलता एक असलेला दहा वर्षांचा मुलगा हर्षसह मढवी यांच्या चाळीत भाड्याने राहतात. मात्र, पत्नी गावी गेल्यावर मुलगा आणि ते दोघेच घरी होते. बिंदू हे वाहनचालक असल्याने त्यांच्या घरी येण्याच्या वेळा ठरलेल्या नाहीत. त्यामुळे कामासाठी बाहेर पडल्यावर घरात मुलगा एकटाच राहात असल्याने बिंदू मंगळवारी मुलाला सोबतच घेऊन कामावर गेले होते. मात्र वाहनातून मालाची डिलिव्हरी करण्यासाठी गेले असता ग्लोबल लॉजिस्टिक्स टर्मिनलमध्ये लहान मुलाला प्रवेश देण्यास सुरक्षा रक्षकांनी नकार दिला.

इतक्यात बिंदू यांना शेजारीच राहणारा कांतीराम दिसला. बिंदू यांनी १० वर्षीय हर्षला कांतीरामकडे दिलं आणि घरी सोडण्यास सांगितलं. काम झाल्यानंतर हर्ष घरी पोहोचला का हे पाहण्यासाठी बिंदू यांनी कांतारामला फोन केला. मात्र काहीही प्रतिसाद मिळाला नाही. बिंदू यांनी लगेचच घर गाठलं. मात्र, कांताराम आणि हर्ष दोघंही तिथे नव्हते. त्यांनी रात्रभर मुलाचा शोध घेतला मात्र तो सापडला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी खोपटा-पोगोटे रिलायन्स या कोस्टल रोडवरील खाडीत येथील सुरक्षा रक्षकाला हर्षचा पान ५ वर

# हॉटेल व्यवसायातील इर्षेतून खून

**। रसायनी । वार्ताहर ।**

**पोलिसांनी आवळल्या दोघांच्या मुसक्या**

हॉटेल व्यवसायाच्या ईर्षेतून गळा दाबून एकाचा खून केल्याची घटना चौक कलोते येथे घडली.या प्रकरणात पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. नितेश पाटील आणि मारुफ उर्फ मेहबुब हसमत अली अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत.

चौक कलोते येथे महेश भंडारी यांच्या जागेमध्ये कलोते येथील राहणारे भानुदास भिवा चौधरी यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेबाबत पोलिसांना खबर मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक मिलींद खोपडे हे पोलीस ठाण्याकडील पथकासह घटनास्थळी पोहचले. तेथील परिस्थिती पाहून तसेच घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांना फोनवर माहिती दिली. त्यानंतर घटनास्थळी हजर असलेल्या पान ५ वर

# किडरोगाचा आंब्याला धोका

## उत्पादनात ९० टक्के घट होण्याची भिती

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

रायगड जिल्ह्यातील अनेक भागात आंब्याला मोहर चांगल्या पद्धतीने आला. मात्र फुल किडरोगामुळे फुलांमधील रस गायब झाले. त्यामुळे यंदा आंब्याच्या उत्पादनात ९० टक्के घट झाल्याचे आंबा उत्पादक शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये १४ हजारहून अधिक हेक्टर आंबा लागवडीचे क्षेत्र आहे. त्यामध्ये आंबा उत्पादन देणारे १२ हजार हेक्टर क्षेत्रआहे. आंबा उत्पादन वाढीसाठी कृषी विभागाकडून वेगवेगळे प्रयत्न करण्यात आले. जिल्ह्यातील अनेक शेतकरी भातशेतीसह आंब्याची लागवड करण्यावर अधिक भर देत आहेत.

यंदा आंब्याला मोहर चांगला आला. परंतु नोव्हेंबरमध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे मोहर गळून पडले. शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या सल्ल्यानुसार फवारणी केली. त्यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला. मोहरावर किड रोगाचा प्रादुर्भाव जानेवारीपासून पान ५ वर

### अवकाळीमुळे शेतकरी चिंतेत

आंबा काढणीच्या तयारीत होता. शेतकऱ्यांनी फवारणी करून काढणी करण्याच्या कामाला सुरुवात करणार होते. मात्र गेल्या चार दिवसांपासून उरण, कर्जत, खालापूर, पनवेलसह अलिबागमध्येदेखील अवकाळी पाऊस पडला. या अवकाळी पावसामुळे आंबा काळे डाग लागण्याची भिती निर्माण झाली आहे. बाजारात व्यापाऱ्यांकडून आंबे न घेतल्यास शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडण्याची भिती निर्माण झाली आहे. अवकाळीमुळे शेतकरी चिंतेत असल्याचे बोलले जात आहे.



> आंब्याचे उत्पादन समाधानकारक होते. आंबा काढणीच्या तयारीत असताना अचानक अवकाळी पाऊस जिल्ह्यातील अनेक भागात कोसळला. वाऱ्या पावसामुळे आंब्यांना गळती लागली. त्याचा परिणाम आंबा उत्पादनावर झाली आहे. रुळे, पवेळेसह अनेक गावांमधील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी.
>
> – राम पाटील, आंबा उत्पादक

> यंदा मोहर चांगला आला होता. परंतु फुल किड रोगामुळे उत्पादनावर परिणाम झाला. त्यामुळे यंदा आंब्याचे उत्पादन ९० टक्के घटले असून फक्त १० टक्के उत्पादन आले आहे.
>
> – मनोज पाटील, आंबा उत्पादक

# नेरळ-जिते गावाला अवकाळीचा फटका

## शेतकऱ्यांच्या घरांचे नुकसान; पोल्ट्री फार्मवरील पत्रे उडाले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

वादळी वारा आणि अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नेरळ जवळील जिते गावातील ४०हून अधिक शेतकऱ्यांच्या घरांचे वादळी वाऱ्याने नुकसान केले आहे. तर तेथील पोल्ट्री फॉर्मवरील पत्रे उडून गेल्याने ५०० कोंबड्यांचे पिल्लांचा मृत्यू झाला आहे. जिते आदिवासीवाडीमधील एका आदिवासी शेतकऱ्याचे घर पूर्णतः उध्वस्त झाले असून एका आदिवासी शेतकऱ्याच्या अंगावर वाऱ्याने उडून गेलेले पत्रे कोसळल्याने शेतकरी जखमी झाला आहे.



नेरळ जवळील जिते गावातील घरांवरील कौले आणि पत्रे उडून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. अवकाळी झालेल्या पावसामुळे आदिवासीवाडीमधील ग्रामस्थ नामदेव पवार या आदिवासी ग्रामस्थाच्या घराचे पूर्णतः नुकसान झाले आहे. त्याच्या घराच्या छतावरील सर्व पत्रे उडून गेले असून संपूर्ण घराची नासधुस झाली आहे. किराणा साहित्य आणि कपडे अवकाळी पावसाने पान ५ वर




## वे|ध|क

### शरद पवारांचे राज ठाकरेंना प्रत्युत्तर

**नाशिक :** शरद पवार यांनी पूर्वीच्या काळात अनेक राजकीय पक्ष फोडले. त्यामुळे आता शरद पवारांचा पक्ष फुटला आहे, अशी टीका करणाऱ्या राज ठाकरे यांना शरद पवार यांनी खोचक भाषेत प्रत्युत्तर दिले आहे. यावेळी राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यावर शरद पवार यांनी म्हटले की, महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या राज ठाकरे यांचे नक्की काय स्थान आहे, हे माहिती नाही. मी ऐकलंय की, नाशिक हा त्यांचा बालेकिल्ला आहे. पण हल्ली ते नाशिकमध्ये दिसत नाहीत. या दोन वाक्यांच्या पलीकडे शरद पवारांनी राज यांच्याबद्दल बोलणे टाळले.

### बारामतीनंतर अजित पवार गायब

**पुणे :** बारामती लोकसभा निवडणुकानंतर अजित पवार दिसत नाही. नरेंद्र मोदी यांचा बुधवारी मुंबईत रोड शो झाला, सभा देखील झाल्या. मात्र, यात अजित पवार कुठेच दिसले नाही. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. नाशिक येथे शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी अजित पवार यांच्या अनुपस्थिती-वर माहिती दिली. अजित पवार आजारी असल्याची माहिती शरद पवार यांनी दिली आहे. बारामती लोकसभा निवडणुकीत शरद पवार आणि अजित पवार आमने-सामने होते. प्रचाराच एकमेकांवर टीका देखील करण्यात आली. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि शरद पवार यांची कन्या सुप्रीया सुळे, अशी लढत बाराम तीत होती. ७ तारखेला मतदान देखील झाले. तेव्हापासून अजित पवार बाहेर पडले नसल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

# मोदींचा रोड शो गुजराती समाजासाठी

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

**मोदी दहा वर्षांपासून पंतप्रधान असले, तरी मी विधानसभा लोकसभा आणि राज्यसभेमध्ये मागील ५६ वर्षांपासून काम करीत आहे. सध्याच्या घडीला असा एक तरी असा माणूस दाखवावा, असे आव्हान शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले. पंतप्रधान मोदी यांनी दिंडोरीमील जाहीर सभेत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली होती. शरद पवारांना पक्ष सांभाळता आला नाही, तर ते देश काय सांभाळतील, या पंतप्रधान मोदी यांच्या टीकेला उत्तर देताना शरद पवार यांनी मोदींच्या वक्तव्याचा समाचार घेतला.**

## ■ यामुळे सामान्य नोकरदारांचे प्रचंड हाल



मुंबईसारख्या शहरात रोड शो करणे हे शहाणपणाचे लक्षण नाही. त्यामुळे लोकांना तासनतास थांबावे लागते, वाहतूक कोंडी होते, असे वक्तव्य शरद पवार यांनी केले. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मुंबई उपनगरातील घाटकोपर परिसरात रोड शो केला होता. या रोड शोसाठी वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले होते. मुंबई पूर्व उपनगर आणि ठाण्याला जोडणारा लाल बहादूर शास्त्रीमार्ग रोड शोसाठी बंद ठेवण्यात आला होता. याशिवाय, वर्सोवा-घाटकोपर मेट्रो सेवाही काही काळासाठी बंद ठेवण्यात आली होती. यामुळे संध्याकाळी कामावरुन घरी निघालेल्या सामान्य नोकरदारांचे प्रचंड हाल झाले होते. याबद्दल अनेकांनी सोशल मीडियावर नाराजीही व्यक्त केली होती. मुंबईसारख्या शहरात रोड शो करणे, शहाणपणाचे लक्षण नाही. तो भाग प्रामुख्याने गुजराती वस्तीचा आहे. मोदींना रोड शो करायचाच होता, तर मुंबईत मोठे रस्ते असलेला भाग होता. पण मोदींचे लक्ष्य विशिष्ट वर्ग होता. मात्र, त्यामुळे लोकांना त्रास झाला, असे शरद पवार यांनी म्हटले.

पुढे बोलताना पवार म्हणाले, पंतप्रधान मोदी मी इतक्या वर्षात काय केले, असा प्रश्न विचारतात. ते गुजरातचे जेव्हा मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांच्या राज्यातला शेतीचा कोणताही विषय राहिला तर ते माझ्याकडे यायचे. मी ही गुजरातला जायचो. मी एकदा इस्रायलला जात असताना मला मोदींचा फोन आला. त्यांनी सांगितले की, मला अमेरिकेचा व्हिसा नाकारला आहे. मला तुमच्यासोबत इस्रायलला येण्याची इच्छा आहे, मला घेऊन चला, असे ते म्हणाले. मी त्यांना घेऊन इस्रायलला गेलो. इस्रायलमध्ये शेतीतील प्रगत कृषी तंत्रज्ञान आणि इतर गोष्टी मी त्यांना दाखवल्या. एवढं सगळं माहिती असूनही पंतप्रधान मोदी असे का बोलतात, त्याचे कारण राजकारण आहे, असे शरद पवार यांनी सांगितले.

### मोदींकडून विषय भरकटवण्याचा प्रयत्न

**मोदी यांनी कल्याणमधील सभेत भाषण करताना काँग्रेस पक्षाने हिंदू आणि मुस्लिमांसाठी वेगवेगळे बजेट तयार केल्याचे म्हटले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार यांनी म्हटले की, मोदींचे हे बोलणं योग्य नाही. बजेट हे कुठल्या जातीधर्माचे नसते. देशाचे बजेट असते. मोदी बोलतात, ते कधीही होऊ शकत नाही. मोदींचा कॉन्फिडन्स ढासळला आहे. मोदींकडे काही सांगण्यासारखे शिल्लक नाही, त्यामुळे ते विषय भरकटवत आहेत. ते जे बोलत आहेत, त्यापैकी एक टक्कादेखील काही खरे नाही. जातीधर्माचा विचार करून देश चालत नाही, असे शरद पवार यांनी म्हटले.**

### दिंडोरी सभा कांद्यामुळेच सर्वाधिक चर्चेत

**नरेंद्र मोदी यांची दिंडोरी लोकसभेची जाहीर सभा कांद्यामुळेच सर्वाधिक चर्चेत राहिली. गेल्या सहा महिन्यांपासून मोदी सरकारने केलेली निर्यातबंदी आणि त्यानंतर निवडणुकीच्या तोंडावर निर्यातबंदी उठवल्याने राज्यातील शेतकरी हवालदिल झाला होता. त्यामुळे मोदींच्या दिंडोरीमधील जाहीर सभेत एका तरुण शेतकऱ्यांने कांद्यावर बोला, असा प्रश्न उपस्थित केला. यानंतर त्या तरुण शेतकऱ्याला ताब्यात घेण्यात आले होते. या तरुण शेतकऱ्याचे शरद पवार यांनी कौतुक केले. ते म्हणाले की, मोदींना कांद्यावर बोला, असे तरुण शेतकऱ्याने प्रश्न विचारला तर ते योग्य आहे.**

## मुख्यमंत्र्यांची निव्वळ स्टंटबाजी

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाशिक दौऱ्यावर आले असता त्यांच्याकडे पैशांनी भरलेल्या मोठमोठ्या बॅगा होत्या असर गंभीर आरोप केला होता. यावरून महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. गुरूवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा नाशिक दौऱ्यावर आले असता ते हेलिकॉप्टरमधून उतरताच त्यांच्या बॅगांची तपासणी करण्यात आली. त्यांच्या बॅगांमध्ये काहीच आक्षेपार्ह आढळले नाही, असा दावा करण्यात आला.

यावरून विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे.



याबाबत अंबादास दानवे म्हणाले की, त्या दिवशी बॅगा का चेक केल्या नाहीत? आता आरोप केल्यानंतर ते बॅगांमध्ये काही घेऊन जाणार आहेत का? ही फक्त नाटकबाजी आहे. त्या दिवशी बॅगा का नाही चेक केल्या, याचे उत्तर तपास यंत्रणांनी द्यावे. मुख्यामंत्र्यांनी आणलेल्या बॅगा कुठे गेल्या याची तपासणी करावी. आरोप केल्यानंतर तपासणी झाल्याचे दाखवायचे. नेहमी मुख्यमंत्री जशी शो बाजी करतात तशी त्यांनी केली आहे.

## मोदींनी पराभवाची चिंता करावी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुस्लिमांशी आपले नाते घट्ट आहे व मतांसाठी आपण काम करत नाही, असे सांगणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी पुन्हा जाहीर सभेत राम मंदिर व मुस्लिम द्वेषावर भाषण केले. देशातील जनता मोदींच्या थापेबाजीला बळी पडणार नाही, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी स्पष्ट केले.

कल्याण येथे मोदींची प्रचारसभा झाली. सभेतील भाषणावर प्रतिक्रिया देताना पटोले यांनी त्यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, काँग्रेसच्या जाहिरनाम्याबाबत मोदी बिनबुडाचे आरोप करत आहेत. मुस्लिमांना संपत्ती वाटणार हे जाहीरनाम्यात कुठेच नाही. असे असतानाही



### नाना पटोले यांचे विधान

काँग्रेस मुस्लिमांना संपत्ती वाटणार असा अपप्रचार मोदी करीत आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरही त्यांनी केलेले आरोप खोटे आहेत. आरक्षणाला आरएसएसफ व भाजपचाच विरोध आहे. हे उघड असताना काँग्रेस एएसी, एसटी व ओबीसींचे आरक्षण काढून मुस्लिमांना देणार असा अपप्रचार करीत आहेत.

पुढे म्हणाले, भाजपच्या पराभवाची चिंता करावी, काँग्रेस विरोधी पक्षही बनू शकणार नाही, उद्धव ठाकरेंची शिवसेना व शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नकली असेल तर या पक्षांची एवढी चिंता करण्याची मोदी यांना काय गरज आहे? वास्तविक पाहता भारतीय जनता पक्षाचा लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव होईल, या चिंतेने त्यांची झोप उडाली आहे. या भीतीपोटी ते काहीही बोलत आहेत. काँग्रेसचे दुकान बंद होण्याची चिंता करण्यापेक्षा नरेंद्र मोदी यांनी त्यांची व भाजपच्या पराभवाची चिंता करावी, असेही नाना पटोले म्हणाले.

## संजय राऊतांचा मोदींवर घणाघात

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

गेल्या एक महिन्यात मोदींनी महाराष्ट्रात २८ सभा घेतल्या. शिवसेनेमुळे नरेंद्र मोदींना रस्त्यावर यावे लागले. कितीही सभा घ्या, रोड शो घ्या, हा म हाराष्ट्र तुमच्या मागे उभा राहणार नाही, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. नाशिकच्या अनंत कान्हेरे मैदानावर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरेंच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, मिस्टर फेकू सुद्धा नाशकात होते. भाड्याची माणसे तिथे आली. मोदी भाषण करताना एका तरुणाने प्रश्न विचारला तर पंतप्रधान त्याच्याकडे रागाने पाहत भारत माता की जय म्हणत निघून गेले. मात्र, तो शेतकरी रामाचा सुधा आहे आणि भारत मातेचे सुपुत्र आहे. जर तुम्ही काही न बोलता जात असाल तर या थापाड्याची देशाला गरज नाही. माझ्या शिवाय देशाला पर्याय नाही ही मोदींची घमेंड आहे. ती उतरविण्याची वेळ आता आलीय.

## शिंदे दिसताच ठाकरेसेनेच्या घोषणा

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात समावेश असलेल्या नाशिक मतदारसंघातील प्रचार सध्या शिगेला पोहोचला आहे. महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाशिकमध्ये गुरुवारी रोड शो केला. एकनाथ शिंदे यांच्या रोड शो वेळी प्रचाररथ रस्त्यावरुन जात होता. त्यावेळी एका चौकात ठाकरे गटाचे शिवसैनिक आणि एकनाथ शिंदे हे आमनेसामने आले. तेव्हा घडलेल्या प्रसंगाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर



व्हायरल होत आहे.

एकनाथ शिंदे यांचा रोड शो सुरु झाल्यानंतर एका चौकात ठाकरे गटाचे कार्यकर्ते घोळका करुन उभे होते. त्यांनी एकनाथ शिंदे यांचा प्रचाररथ येताना दुरुनच पाहिले. त्यानंतर ठाकरे गटाच्या सैनिकांनी 'पन्नास खोके, एकदम ओके'ची घोषणाबाजी सुरु केली.

## धुळ्यात प्रथमच महिलेला उमेदवारी

**। धुळे । प्रतिनिधी ।**

लोकसभेच्या धुळे मतदारसंघात निवडणुकीचे वातावरण तापत चालले आहे. उमेदवारांचे कुटुंबही अंगाची काहीली होणाऱ्या उन्हात ताकदीनिशी रिंगणात उतरले आहेत. स्वातंत्र्यानंतर अवलोकन केले असता काँग्रेसने या मतदारसंघातील निवडणुकीत ७२ वर्षांत प्रथमच महिलेला उमेदवारी देत मतदारांचे लक्ष वेधले आहे.



देशाच्या स्वातंत्र्यानंतर धुळे लोकसभा मतदारसंघातील पहिल्या महिला उमेदवाराचा मान डॉ. शोभा बच्छाव यांनी पटकावला आहे. त्या पक्षांतर्गत उमेदवारीच्या स्पर्धेत नव्हत्या. त्यांचे उमेदवार म्हणून नाव चर्चेत नव्हते. उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेपूर्वी पक्षश्रेष्ठींकडून त्यांचे नाव जाहीर झाले. प्रचाराच्या कमी कालावधीत मतदारसंघातील प्रस्थापितांचे आव्हान पेलण्याची महिला उमेदवार म्हणून डॉ. बच्छाव यांच्या कसोटीचा हा काळ ठरतो आहे. मतदारसंघातील घडामोडींचा वेध घेत डॉ. बच्छाव यांचे कुटुंबही प्रचारात जुंपले आहे.

## चव्हाणांचे मुख्यमंत्रीपदाबाबत भाष्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीसाठी चार टप्प्यातील मतदान पार पडले. या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेसने महाविकास आघाडीच्या माध्यमातून महायुतीसमोर तगडे आव्हान उभे केले आहे. महाविकास आघाडी लोकसभेच्या निवडणुकीसारखे मोठे आवाहन विधानसभेच्या निवडणुकीमध्येही देण्याच्या तयारीत आहे. मात्र, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी कोण असेल? यासंदर्भात महाविकास



आघाडीत बऱ्याच चर्चा रंगताना पाहायला मिळत आहेत.

यावर काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा फार्म्युला कसा असेल? याबाबत भाष्य केले आहे. यावर बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हा सर्वात मोठ्या पक्षाचा म्हणजे ज्या पक्षाच्या आमदारांची संख्या जास्त असते त्या पक्षाचा होतो. जर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे जास्त आमदार निवडून आले तर त्यांच्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल. आतापर्यंत आमच्यामध्ये म्हणजे जेव्हा राष्ट्रवादी आणि काँग्रेस बरोबर लढत होतो तेव्हा ज्या पक्षाचे जास्त आमदार असतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होत होता. आताही ज्या पक्षाच्या जास्त जागा निवडून येतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल, असा फार्म्युला असेल. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीआधी आम्ही मुख्यमंत्री पदाचा चेहरा ठरवणार नाहीत. असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

## जाब विचारला तर काय चुकले?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कांद्याच्या मुद्यावरून बोला, असे म्हणताच पोलिसांनी किरण सानप या तरूणाला सभेतून बाहेर काढले. पंतप्रधानांना जाब विचारत असेल तर काय चुकले त्याचे? असा सवाल शरद पवार गटाचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला आहे. नाशिकच्या दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील भाजप उमेदवार केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांच्या प्रचारासाठी पिंपळगावमध्ये बुधवारी मोदी यांची सभा आयोजित करण्यात आली होती. सभेआधी कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून जयदत्त होळकर यांच्या नेतृत्वाखाली कांद्याच्या माळा घालून निर्यातबंदी विरोधात आंदोलन करण्यात आले. तर सभेत मोदी हे भाषण करत असताना एका शेतकऱ्याने कांद्यावर बोलण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. त्यामुळे काही गोंधळ निर्माण झाला होता. या संपूर्ण प्रकरणावर आता आव्हाड यांनी ट्विट करत मोदींवर निशाणा साधला आहे.

## ही पापाची नाही तर बापाची आघाडी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभेच्या अखेरच्या टप्प्यातील रणधुमाळीत राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. नाशिकमधील सभेत नरेंद्र मोदी यांनी उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसवर वाग्बाण सोडले. त्यांनी दोघांवर तुफान हल्लाबोल चढवला. अखेरच्या टप्प्यातही आरोपांची राळ उठली आहे. तर शब्दांना धार चढली आहे. नकली शिवसेनेने काँग्रेससमोर गुडघे टेकविल्याचा आरोप मोदींनी केला होता. त्यावर संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

संजय राऊत म्हणाले, हे चोर



लोकं आहेत, ज्यांनी पार्टीवरती डाका टाकला. यांनी मान्य केले की चोरी केली आहे. हे कसे लोक आहेत जे पार्टी चोरी करतात आणि वरून बोलतात, असा चिमटा राऊतांनी काढला. चोराला मदत करणारे पंतप्रधान, गृहमंत्री, निवडणूक आयोग हे लोक चोरांचे साथीदार असल्याचा आरोप त्यांनी केला. हेच लोक चोरांचे सरदार आहेत. ४ जून नंतर या देशात भाजपाचे अस्तित्व राहणार की नाही, हा मोठा प्रश्न आहे. ही पापाची आघाडी नाही तर यांच्या बापाची आघाडी आहे. येणाऱ्या काळात हे त्यांना कळेल.

## मतदान प्रक्रियेसाठी यंत्रणा सज्ज

**कल्याण :** या लोकसभा मतदार संघातील एकूण ६ विधानसभा मतदार संघात १९६० मतदान केंद्रे असून १० पेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी तसेच जास्त घनता असलेल्या ठिकाणी म्हणजे एकूण १०१२ मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही आणि वेब कास्टींगची सुविधा पुरविण्यात आली आहे. सद्यास्थितीतील तीव्र उन्हाळा लक्षात घेता प्रत्येक मतदान केंद्रावर १ मेडिकल कीट तसेच किमान आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

## भाजपवर कटआऊट्स हटवण्याची वेळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील शिवाजी पार्क परिसरात लावलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहांचे अनधिकृत कटआऊट्स हटवण्याची वेळ भाजपवर आली. शुक्रवारी शिवाजी पार्कवर महायुतीची सांगता सभा पार पडणार आहे, या सभेसाठी हे कटआऊट्स लावण्यात आले होते. हा प्रकार आचारसंहितेचे उल्लंघन असल्याचे सांगत निवडणूक आयोगाने हे आदेश दिले आहेत. आयोगाच्या



आदेशानंतर हे कटआऊट्स कडक पोलीस बंदोबस्तात हटवण्यात आले आहेत. यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. भाजपच्या कार्यकर्त्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली. त्यामुळे त्यांनी इथे चांगलाच राडाही घातल्याचे वृत्त आहे.

## भाजपला पोरंच होत नाही म्हणून गद्दार मांडीवर

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

उद्धव ठाकरे यांची नाशिकमध्ये विराट सभा पार पडली. यावेळी त्यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. मोदीजी तुम्ही ४ जूननंतर पंतप्रधान नसाल. तुम्ही पंतप्रधान नसाल तेव्हा पीएम केअर फंडचे काय करणार आहात? कुणाच्या हातात तो देणार आहात? तेही सांगून टाका, असे सांगतानाच तुम्ही पंतप्रधान होत नाही. मला भाजपची चिंता वाटते. कारण दोन वर्षांनंतर तुम्ही झोळी लटकवून निघून जाल. तेव्हा भाजपची अवस्था काय होईल? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी

### ■ उद्धव ठाकरेंची मोंदींसह शिंदेंवर सडकून दिका



केला.

या सभेत उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी, भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली. विषय अनके आहेत. किती विषयांवर किती बोलायचे? पण काही गोष्टींवर आवर्जून बोलणे भाग आहे. मोदीजी सुद्धा नाशिकमध्ये होते. आता त्यांच्या खरंच मनावर एवढा ताण पडलाय? मध्ये कोणीतरी सांगितलं की, ते झोपतच नाही. झोपले नाही किंवा झोप पूर्ण झाली नाही तर डॉक्टर सांगतात की, मेंदूवर परिणाम होतो आणि लोक काही वेळेला भ्रमिष्टासारखे बोलायला लागतात. मोदीजी तुम्हाला कल्पना नसेल, स्वत: शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची जबाबदारी माझ्यावर सोपवली. तरीही काही पावटे, पावटेचा गुणधर्म तुम्हाला माहिती आहे. हे पावटे आपल्या शिवसेनेला नकली शिवसेना म्हणतात, असा घणाघात उद्धव ठाकरेंनी केला.

ठाकरे पुढे म्हणाले, राजकारणाबाबत बोलतोय, कारण राजकारणात भाजपला पोरंच होत नाही, म्हणून त्यांना सगळी नकली संताने म्हणजे आपल्याकडचे सुद्धा गद्दार मांडीवर घ्यावे लागले. एकीकडे भ्रष्टाचाराचे आरोप करायचे, सत्तर हजार कोटीचा उपमुख्यमंत्री, तो उपमुख्यमंत्री किती किंमतीचा असेल, हे सर्व नकली संताने. कारण तुम्हाला राजकारणात पोरंच होत नाही म्हणून त्यांनी आणखी एक नकली संतान मांडीवर घेतले. ते तर फारच वाह्यात निघाले, ते म्हणजे प्रफुल्ल पटेल, असा घणाघात ठाकरेंनी केला.

## आदित्य ठाकरेंचा सरवणकरांना इशारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बाप्पाच्या मिरवणुकीत बंदुक काढली, तुम्हाला आत टाकणारच, असा इशारा युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकर यांना दिला आहे. शेवटच्या टप्पातील मतदानासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीची प्रचारसभा सुरू आहे. बुधवारी ठाकरे गटाची मुंबईत सभा झाली. यावेळी आदित्य ठाकरे बोलत होते. यावेळी बोलतांना त्यांनी सदा सरवणकर यांच्यासह शिंदे गटावरही आपली तोफ डागली आहे. ते म्हणाले,



गणपती बाप्पाच्या मिरवणुकीत बंदूक काढली आणि पोलिस स्टेशनमध्ये जाऊन त्यांनी बंदूक चालवली हे त्यांचे हिंदूत्व आहे का? आमच्या गणपती बाप्पांच्या मिरवणुकीत तुम्ही बंदूक काढली तुमच्यावर युएपीए कायदा मी टाकणार आहे, सोडणार नाही, पोलिस स्टेशनमध्ये फायरींग केले तुम्हाला आत टाकणार, असा रोखठोक इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.

पुढे आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटाला खोचक टोला लगावला आहे. ते म्हणाले, या सर्वांना शिवसेनेने पद दिली. शिवसेनेमुळे ते मोठे झाले. महापालिकेचे स्टॅन्डींग कमिटीचे पदही दिले होते. सर्व काही खायचे होते तेव्हा खाल्ले. अपचन झाल्यावर गुजरातला पळून गेलात. हिंमत असेल तर समोरून वार करा. मागून वार करणारे तुम्ही स्वतः:ला शिवसेना म्हणून कसे घेऊ शकता, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

**निवडक**

## रसामृत यज्ञोत्सवाची सांगता

**रसायनी :** रामदास पाटील यांच्या प्रेरणेने व हनुमंत लभडे यांच्या संकल्पनेतून, ज्ञानेश्वर महाराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड भक्ती रसामृत यज्ञोत्सव निमित्ताने ग्रामस्थ व भाविकांच्या माध्यमातून वारद येथे अखंड ज्ञान, जप यज्ञ, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण दिपोत्सवाच्या माध्यमातून सांगता करण्यात आली. या सोहळ्याचे तिसरे वर्ष असून रोज नित्यनेमाने काकडा, भजन, प्रवचन सामुदायिक पारायण तसेच किर्तनांचे आयोजन करण्यात येत होते.

## फेऱ्या वाढीची गरज

**माथेरान :** सरत्या वार्षिक पर्यटन हंगामात निदान पर्यटन वाढीसाठी मिनीट्रेनच्या फेऱ्यात वाढ होणे गरजेचे असून याच मिनीट्रेनच्या माध्यमातून पर्यटनात वाढ होऊन सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यासाठी माजी माथेरान रेल्वे स्टेशन मधील स्टेशन मास्टर मीना यांची भेट घेऊन मिनीट्रेनच्या फेऱ्यांत वाढ करण्यासाठी सूचित केले. शटल सेवेच्या माध्यमातून वर्षाकाठी लाखो रुपयांची उलाढाल होत असते. तरीसुद्धा रेल्वे प्रशासन गांभीर्याने लक्ष केंद्रित करत नाही.

## मनोरुग्ण महिला बेपत्ता

**खोपोली :** नगरपालिका हद्दीतील लव्हेज या गावातील सर्वे नंबर दोन मधील तीन मजली इमारत अचानक जागेवरच कोसळल्याने परिसरातील नागरिकांत भितीचे वातावरण पसरले. ही घटना मंगळवारी पहाटे तीनच्या दरम्यान घडली. प्रचंड आवाज, धुळीचे लोट यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. अपघातग्रस्त मदत टीमचे सदस्य, अग्निशामक दलाचे जवान, महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. इमारत अनेक वर्षापासून बंद असल्याने सुदैवाने जीवित हानी झाली नाही.

## तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

**सुकेळी :** खाजगी रुग्णालयात अनेक गरीब रुग्णांना मोठ्या प्रमाणात होणारा खर्च हा परवडत नसतो. त्यामुळेच बी.सी.जिंदल रुग्णालयात ऐनघर विभागातील तसेच आजुबाजूच्या परिसरातील गोरगरीब जनतेसाठी त्यांना सर्वच आजारांवरती उपचार मिळावेत यासाठी सद्यपरिस्थितीत जिंदाल रुग्णालयाची सेवा ही २४ तास सुरू करण्यात आली असुन जिंदल रुग्णालयात वेगवेगळ्या आजारांवरती मेडिकवर रुग्णालय वाशी येथिल तज्ञ डॉक्टरांच्या भेटी देखिल सुरू करण्यात आल्या आहेत.

## महिलेचे दागिने लंपास

**कोलाड :** सविता पांडुरंग शेडगे एसटी बसमध्ये माणगाव-कोलाड दरम्यानच्या प्रवास करत असताना त्यांच्या जवळील पर्स अज्ञान चोरट्याने लंपास केले. ही घटना सोमवारी (दि.१३) सकाळी १०:४५ वाजताच्या सुमारास घडली. चोरीला गेलेल्या पर्समध्ये ६०,००० रू कींमतीचे सोन्याचे गंथन, २०,००० रू कींमतीचे कानातले, २०,००० रू किंमतीचे कानातली चैन, २०,००० रू. किंमतीच्या ३ अंगठया, तसेच २०,२०० रोख रक्कम, असे एकुण १,४०,२०० रू. रक्कमेसहित दागिन्यांवर चोरट्याने माल लंपास केला आहे.

# वावे-बेलोशी रस्त्याचे झाले तळे




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील बेलोशी-वावे रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या खड्डेमय रस्त्यावरून वाहन चालविणे जिवेघेणे होत आहे. बुधवारी मध्यरात्री पडलेल्या अवकाळी पावसामुळे या रस्त्यावरील खड्ड्यांना तळ्याचे स्वरूप आले आहे. आता ही स्थिती असल्यास पावसाळ्यात काय परिस्थिती होणार, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष द्यावे अन्यथा तीव्र आंदोलन पुकारले जाईल, असा इशारा काही ग्रामस्थांनी दिला आहे.

अलिबाग तालुक्यातील बेलोशी-वावे हा साडेचार किलो मीटरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येतो. या रस्त्याची डागडूजी दीड वर्षापुर्वी करण्यात आली होती. त्यामुळे प्रवासी सुखावून गेले होते. परंतु, नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे रस्त्याची अवस्था झाली आहे. वावेपासून बेलोशीपर्यंत ठिकठिकाणी लहान मोठे खड्डे आहेत. या खड्डयातून वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. एक खड्डा चुकविण्यास गेल्यास दुसरा खड्डा आडवा येत आहे. त्यामुळे अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे. या रस्त्याचे काम पावसाळ्यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग करेल अशी अपेक्षा होती. परंतु, पावसाळा सुरु होण्यासाठी काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. मात्र, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणतीही हालचाल सुरू नाही. या रस्त्याच्या डागडुजीसह नुतनीकरणासाठी लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत. परंतु, रस्त्यावरील खड्डे कायमच असल्याचे बोलले जात आहे.

बुधवारी मध्यरात्री अवकाळी पाऊस पडला. या पावसात बेलोशी-वावे रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. अनेक खड्ड्यांना तळ्याचे स्वरूप आले आहे. त्यामुळे वाहन चालविणे कठीण होऊन बसले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या कामाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

> बेलोशी-वावे रस्त्याचे काम अर्थसंकल्पातून मंजूर आहे. चौल-वावे-बेलोशी पर्यंतच्या रस्त्यासाठी तीन कोटी रुपयांचे मंजूर डांबरीकरण, मजबूतीकरण केले जाणार आहे. पावसाळ्यापुर्वी येथील खड्डे बूजविण्याचे काम केले जाणार आहे.
>
> - राजू डोंगरे
> उपअभियंता- अलिबाग

# मृगगड फलक मोहीम फत्ते

**। सुधागड/पाली । वृत्तसंस्था ।**

सुधागड तालुक्यातील भेलीव येथील मृगगड हा ऐतिहासिक महत्वाचा किल्ला आहे. या किल्ल्यावर दुर्गवीर प्रतिष्ठानातर्फे नुकतीच फलक मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत किल्ल्यावर माहिती व दिशा दर्शक फलक लावण्यात आले. या फलकांमुळे दुर्गप्रेमी व पर्यटकांचे गड रोहन आता सुकर झाले आहे.

सद्यस्थितीत गडावरील जुने माहिती व दिशादर्शक फलक जे जीर्ण झाले होते ते पुन्हा नव्याने लावण्यात आले. यामध्ये गडाची पूर्ण माहिती असलेले फलक ज्यामध्ये गडाचा पूर्ण नकाशा व गडावरील वास्तू दर्शविलेला फलक लावण्यात आला. तसेच, गडाकडे जाणारे मार्ग दाखविणारे फलक लावण्यात आले. यामुळे गडावर आलेल्या प्रत्येक दुर्गप्रेमी व पर्यटकांना गडावरील माहिती मिळेल. शिवाय नव्याने आलेल्यांना गडावर कसे जावे व तिथे काय काय आहे हे सहज कळणार आहे. सर्व दुर्गवीरांनी अतिशय मेहनत घेऊन हे फलक लावले. लोखंडी खांब, पत्रे व चौकट, रंग, फलक आदी सर्व सामान घेऊन गड गाठला व महत्वाच्या ठिकाणी हे फलक सुयोग्यारीत्या लावण्यात आले.

या मोहिमेस 'आम्ही सहयाद्रीचे शिलेदार' यांचाही सहभाग लाभला. या मोहिमेत अर्जुन दळवी, विठ्ठल केंबळे, प्रमोद डोंगरे, सिद्धांत शिंदे, प्रतीक सुर्वे, भूषण पाटील व पार्थ शिंदे हे दुर्गवीर सहभागी झाले होते.




### सलग १२ वर्षे गड संवर्धनाचे कार्य सुरू

**दुर्गवीर प्रतिष्ठानातर्फे मागील १२ वर्षे जसे शक्य होईल तसे गडावरील अनेक कामे लोकसहभागातून व श्रमदानातून आजवर करण्यात आली आहेत. गडावरील अंदाजे १२ फूट खोल असे पाण्याचे टाके जे दगड, चिरे यांनी बुजले होते, ते अनेक वर्षे अनेक मोहिमा करून अखेर मोकळे करण्यात आले आहे. तसेच, काही दिवसांपूर्वी गडावर अरुंद घळ व अवघड कातळावर जिथे अनेक वेळा अपघात होतात तिथे वायर रोप लावून ती जागा सुरक्षित करण्यात आली आहे. याशिवाय अनेक स्वच्छता व संवर्धन मोहिमा राबवून ऐतिहासिक वास्तू सुरक्षित केल्या गेल्या आहेत.**

# प्रा. नम्रता पाटील यांना मुंबई विद्यापीठाची पीएचडी

**। अलिबाग । वार्ताहर ।**



प्रभाकर पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील कला विभाग आणि मराठी विभाग प्रमुख प्रा.नम्रता पाटील यांना नुकतीच मुंबई विद्यापीठाकडून पीएचडी पदवी जाहीर करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचा विषय होता, रायगड जिल्ह्यातील आगरी बोलीतील लोकगीतांचा चिकित्सक अभ्यास. सदर प्रबंध त्यांनी डॉ. अलका मटकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. आगरी बोलीतील लोकगीतांचा वाङ्मयीन आणि भाषिक अंगाने अभ्यास करून त्यांनी आगरी लोकसाहित्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे आगरी बोलीच्या जतन आणि संवर्धनामध्ये या संशोधनाचा निश्चितच उपयोग होणार आहे. यासाठी प्रभाकर पाटील एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील, प्रभाकर पाटील एज्युकेशन संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील आणि महाविद्यालयाचे विविध पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.



● वेध शाळेच्या अंदाजानुसार पाऊस वेळेवर येणार हे खरे धरुन मुरुडचा शेतकरी कामाला लागला आहे. शेतात राब भाजून जमिनीची मशागत करण्यात मग्न आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह हे सुधागड तालुक्यातील राम मंदिर रोड तळ्याशेजारी कार्यरत आहे. या वसतिगृहामध्ये इयत्ता आठवी पासून प्रवर्गनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. अनुसुचीत जाती ८० टक्के, अनुसुचीत जमाती ३ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती ५ टक्के, आर्थिक मागास व इतर मागासवर्गीय दारिद्र रेषेखालील कुटूंबांतील विद्यार्थीनी ५ टक्के, विशेषमागास प्रवर्ग २ टक्के, अनाथ २ टक्के, अपंग ३ टक्के असे आहे.

ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत तहसिलदार यांच्या सहीचा सन २०२३-२४ मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, बँक खाते पासबूक, रहिवासी दाखला, पासपोट आकाराचे दोन छायाचित्र, आधारकार्ड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत.

तसेच, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात विनामूल्य उपलब्ध करण्यात आले आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल एम.जे.नरहरे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन कले आहे.

# तन्वी म्हसकेचा तृतीय क्रमांक

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) यांच्यामार्फत आयोजीत केलेल्या बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत सुधागड तालुक्यातील वावे येथील तन्वी मंगेश म्हसके हीने सुकेळीतील जिंदल माउंट लिटेरा झी स्कुलमध्ये बारावी सायन्स सीबीएसई बोर्ड परीक्षेत ९०.४० टक्के गुण मिळवून स्कुलमध्ये तृतीय क्रमांक पटकाविला आहे. या यशात मोलाचे आणि परिक्षाभिमुख मार्गदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका मिस लिली रॉय, शिक्षक गौरी शंकर प्रसाद, ओंकार खोंडे, पूजा ईसाई, व्यंकटेश ममद्याल, सुविज्ञा म्हात्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



## सानिध्य डोंगरे अव्वल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



देशातील परीक्षापूर्व तयारी सेवा क्षेत्रातील आघाडीचे संस्थान आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड पनवेल येथील दहावीचा विद्यार्थी सानिध्य क्षितिज डोंगरे याने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ सीबीएसई परीक्षेत सर्वोच्च गुण मिळवून अव्वल क्रमांक पटकावला आहे. सानिध्यने गणित आणि संस्कृतमध्ये १०० गुण मिळवून तसेच सामाजिक विज्ञान आणि विज्ञानामध्ये ९९ गुण मिळवून प्रशंसनीय कामगिरी साध्य केली आहे. आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडचे मुख्य शैक्षणिक आणि व्यवसाय प्रमुख अमित सिंग राठोड यांनी विद्यार्थ्यांचे त्यांच्या उत्कृष्ट यशाबद्दल अभिनंदन केले.

# अवकाळीने घरांचे मोठे नुकसान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

वादळी वारा आणि अवकाळीसह आलेल्या गारपिटीने कर्जत तालुक्याला झोडपले आहे. या पावसाने नसरापूर ग्रामपंचायतमधील दोन घरे उध्वस्त झाली आहेत. तर उन्हाळी राजनाल्याच्या पाण्यावर लावलेल्या शेतीचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी हतबल आहेत.

कर्जत तालुक्यात दि.१३ आणि १४ मे रोजी वादळी वाऱ्याने पावसाळा सुरुवात झाली. यामुळे तब्बल १५ विद्युत पुरवठा करणारे खांब कोसळले आणि त्यामुळे चांधई तसेच आसपासच्या सर्व गावातील लोकांची विजे अभावी अत्यंत दयनीय अवस्था झाली.



याच भागातील बऱ्याच ठिकाणी अत्यंत मोठ्या अश्या गारांचा वर्षाव मंगळवारी संध्याकाळी झाला. तर, वादळाने अनेकांच्या घरांची पत्रे उडाली. नसरापूर आणि चांधई येथील शेतकऱ्यांची घरे देखील उद्ध्वस्त झाली. सरकार तसेच प्रशासन यांच्याकडून पंचनामे करून घेण्यात यावेत, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# एमआयडीसी प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध

**। वडखळ । प्रतिनिधी ।**


औद्योगिक विकास महामंडळामार्फत डोलवी औद्यागिक विकास क्षेत्रासाठी पेण तालुक्यातील खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारघाट या गावातील ३६७ एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. या भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यास शेतकऱ्यांनी लेखी हरकत घेत विरोध दर्शवला. यासंदर्भात पेणचे उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी, बुधवारी सुनावणी घेतली.

भूसंपादनासाठी औद्योगिक विकास महामंडळामार्फत याआधी ३ व १५ फेब्रुवारी २०२१ रोजी अधिसूचना काढली होती. त्या वेळीही बाधित शेतकऱ्यांनी हरकत घेत विरोध दर्शविला होता. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उद्योग मंत्री व प्रशासनास निवेदन देत उपोषण, जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला तसेच राज्य अधिवेशनात लक्षवेधीद्वारे आमदार जयंत पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडली. ग्रामपंचायतींच्या मासिक सभेतही भूसंपादनाविरोधात ठराव झाले आहेत, स्थानिक आमदार, जिल्हापरिषद सदस्य. पंचायत समिती सदस्य यांनी शेतकऱ्यांना पाठिंबा असल्याचे पत्र दिले आहेत. शेतकऱ्याचा तीव्र विरोध असल्याने भूसंपादनाची अधिसूचना रद्द करावी, असे निवेदन शेतकरी संघर्ष समितीतर्फे उपविभागीय अधिकाऱ्यांना बैठकीत देण्यात आले.

यावेळी शेतकरी के. जी.म्हात्रे, चंदू पाटील, गजानन पेडवी, नीलेश पाटील, दिगंबर पाटील, सुनील कोठेकर, गजानन मोकल, सुशील कोठेकर आदी उपस्थित होते.

एमआयडीसी प्रकल्पाला आमचा विरोध असून हा प्रकल्प रद्द करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. हरकतींचा अहवाला सरकारदरबारी पाठवणार शेतकऱ्यांचे भूसंपदनाबाबत असलेले म्हणणे तसेच हरकतींबाबतचा अहवाल सरकारकडे पाठवला जाईल, असे आश्वासन या वेळी उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी दिले. तर शेतकऱ्यांचा विकासाला विरोध नाही, परंतु विकासाचा केंद्रबिंदू शेतकरी असला पाहिजे, त्याच्या जमिनीला योग्य भाव मिळाला पाहिजे, त्यांना रोजगाराची साधने उपलब्ध झाली पाहिजे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व वास्तुविशारद अतुल म्हात्रे यांनी केली आहे.

# पाण्यासाठी ग्रामस्थांच्या खिशाला भुर्दंड



- **पारंपरिक विहिरीतील पाणी अक्षरशः विकत घेण्याची वेळ**
- **जलजिवन मिशन अंतर्गतची कामे अर्धवट**

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील यशवंतनगर-नांदगांव पंचक्रोशीतील बहुतांशी ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना पाणी पुरवठा करणाऱ्या विविध योजनांच्या विहिरींनी तळ गाठल्यामुळे दोन तीन दिवसांआड तास अर्धातास पाणीपुरवठा करणे ग्रामपंचायतींना भाग पडत आहे. तर काही ग्रामस्थांना बिसलेरी अथवा अन्य खाजगी फिल्टर केलेल्या पाण्यासह येथील खाजगी व पारंपरिक विहिरीतील पाणी अक्षरशः विकत घ्यावे लागते आहे.

येथील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून तीन विहिरी खोदण्यात आल्या आहेत. परंतु, या सर्व विहिरीतील पाण्याच्या पातळीने मार्च महिन्यातच तळ गाठला. त्यामुळे पाण्याची टंचाई भासू लागल्याने एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यापासूनच येथे पाणी कपात करण्यात आली आहे. सद्या तर दोन दिवसांनी अर्धा ते एक तासभर पाणी सोडले जात आहे. तसेच, गावच्या काही भागात विहुर पाझर तलावातील पाण्याचा पुरवठा केला जातो. या पाण्याच्या शुद्धीकरणासाठी ग्रामपंचायतीने बसवलेल्या दोन फिल्टर द्वारे नांदगाव खालचा मोहल्ला व कोळीवाडा भागात धरणातील पाणी शुद्ध करुन नागरिकांना पुरवले जाते. परंतु, विस लिटर पाण्यासाठी त्यांना दहा रुपये खर्च करावे लागतात.

तालुक्यातील मजगाव ग्रामपंचायतीतील नागरिकांना गावातील पारंपरिक विहिरीतील पाणी विस रुपये हंड्याने विकत घ्यावे लागत आहे. तर, अन्य वापरासाठी शंभर ते दोनशे रुपये दराने पाचशे लिटर पाण्यासाठी मोजावे लागत आहेत. सद्याच्या वाढलेल्या तापमानाबरोबर जसजसा पावसाळा लांबेल तसतसा त्यांचा हजारोंचा खर्च हा पिण्याच्या पाण्यावर होणार आहे. दरम्यान, केंद्राच्या व राज्याच्या जलजीवन मिशन व हर घर जल योजनांचे मोठ्या थाटात भूमीपूजनाचे सोहळे पार पडले आहेत. या योजनांच्या अंतर्गत जलवाहिन्या टाकण्याची कामे अनेक ठेकेदारांनी अर्धवट ठेवून योजनेअंतर्गत तिस टक्के रक्कम उचलल्याचे वृत्त आहे. या योजनाही सद्या अस्तित्वात असलेल्या विहिरीतील पाण्यावरच अवलंबून असणार आहेत.

केंद्राच्या योजनेसाठी येथील खारआंबोली धरणातील पाण्याचा पुरवठा अनेक ग्रामपंचायतींना करण्यात येणार असल्याचे कळते. सद्या या धरणातून पाण्याचा पुरवठा मुरुड शहरातील जनतेला केला जात आहे. याच धरणातील पाणी नजिकच्याच दिघी पोर्टलाही देण्यात येणार असून शिवाय धरणाच्या परिसरातील शेतीलाही पुरविण्यात येणार आहे. मात्र, धरणातील एकूण पाणीसाठा व या सर्व योजनांचा मेळ घालण्यासाठी सर्वांनाच अक्षरशः तारेवरचीच कसरत करावी लागणार आहे.

# सुवर्णकार ऐक्यवर्धक मंडळाचे स्नेहसंमेलन



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रविवार दि.१२ मे रोजी मुंबई अहिर सुवर्णकार ऐक्यवर्धक मंडळाचे वार्षिक सर्वसाधारण सभा आणि स्नेहसंमेलनाचे आयोजन वांद्रे (पश्चिम) येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात सुवर्णकार समाजाचे आराध्यदैवत श्री संत शिरोमणी नरहरी सोनार महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार आणि दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवानंद टाकसाळे, विनायक विसपुते, डॉ. अभय विसपुते, श्रीकांत मुरलीधर सोनवणे, डॉ. अजय भामरे, ॲड. सी.डी.सोनार, ॲड. राजन दीक्षित, सुरेखा सोनार, प्रभाकरजी मोर प्रकाश खरोटे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर मोरे यांनी केले.

## कांदे आणि जय श्रीराम

ज्या घाटकोपरमध्ये प्रचंड मोठे होर्डिंग पडून सोळा लोक मेले त्याच परिसरात ४८ तासांमध्ये पंतप्रधान मोदींनी जल्लोषात रोड शो करावा हे भाजपच्या राजकारणाला अगदी साजेसे झाले. आग लागो, पूर येवो की लोक मरोत, मोदींचा प्रचार चालू राहिलाच पाहिजे हे त्यांचे मुख्य सूत्र आहे. चार वर्षांपूर्वी ऐन कोरोनाच्या साथीत पश्चिम बंगालमध्ये मोदी लाखालाखांच्या सभा घेत होते. घाटकोपरमध्ये समजा राहुल यांनी एखादी सभा घेतली असती तर मिडियाने व भाजपने एकच हल्लाबोल केला असता. मोदी यंदाच्या निवडणुकीत पंधरा-वीस वेळा महाराष्ट्रात येऊन गेले आहे. कालच्या एका दिवसात त्यांनी नाशिक, कल्याणच्या सभा आणि हा रोड शो असे कार्यक्रम केले. याखेरीज शुक्रवारी मुंबईत मोठी सभा आहेच. चारसो पारचा नारा देणाऱ्या भाजपला महाराष्ट्राने चांगलेच जेरीला आणले आहे याचा हा पुरावा आहे. निवडणुकीचे निकाल काहीही लागोत, पण भाजपच्या दिल्लीतून चाललेल्या गुंडगिरीला महाराष्ट्र भीक घालणार नाही हे येथील जनतेने दाखवून दिले आहे. मोदी शिवसेना आणि राष्ट्रवादीवर नकली असल्याची टीका करतात. काँग्रेससोबत कसे गेलात असा सवाल ते करतात. पण मोदींच्या हुकुमशाहीच्या विरोधात हे आणि इतर सर्व प्रागतिक पक्ष आपले मतभेद विसरून एकत्र आले आहेत याची जाण येथील जनतेला आहे. दुसरे म्हणजे मोदींच्या खोटारडेपणाचा आणि सतत हिंदू-मुस्लिम करण्याचा लोकांना वीट आला आहे. नाशिकच्या सभेत याचे स्पष्ट प्रत्यंतर आले. तेथे मोदींनी काँग्रेस कशी मुस्लिम-धार्जिणी आहे अशी आपली नेहमीची टेप वाजवायला सुरूवात करताच एका शेतकऱ्याने उठून त्यांना कांद्यावर बोला असे सुनावले. खरे तर मोदींना जनतेबाबत खरेच मनापासून कळकळ असती तर त्यांनी त्या शेतकऱ्याचे म्हणणे पुरते ऐकून घेतले असते. त्याचे समाधान होईल अशा रीतीने उत्तरे दिले असते. पण मोदींनी यातील काहीच केले नाही.

### निर्यात बंदीविषयी मौन

उलट या शेतकऱ्याला पोलिसांनी पकडून बाहेर नेले. भाजपच्या इतर कार्यकर्त्यांनी मोदी, मोदी असा घोष करायला सुरूवात केली. खुद्द मोदींनीही जय श्रीरामचा नारा दिला. थोडक्यात, तुम्ही कांद्यावर बोलायची मागणी केलीत तर मोदींचे त्यावर उत्तर राहील की आम्ही रामाचे मंदिर बांधले. याच सभेत मोदी नंतर कांद्यावर बोलले. पण त्यांचे उत्तरही नमुनेदार होते. शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत बोलण्याऐवजी निर्यात किती वाढली याची सरकारी आकडेवारी त्यांनी दिली. यंदा कांद्याचे उत्पादन कमी झाले. त्यामुळे देशातला पुरवठा कायम राहावा व दर वाढू नयेत म्हणून केंद्राने निर्यातीवर बंदी घातली. त्यामुळे देशातले भाव पडले. शेतकऱ्यांना निर्यातीतून जे उत्पन्न मिळू शकले असते ते बुडाले. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी संतप्त आहेत. त्याचा फटका लोकसभा निवडणुकीत बसेल हे लक्षात आल्यावर अलिकडे ही बंदी उठवण्यात आली. मात्र ते करतानाही त्यावर निर्यातशुल्क लागू करण्यात आले. त्यामुळे प्रतिकिलो सुमारे सत्तर ते ऐंशी रुपये या दरानेच कांदा निर्यात झाला पाहिजे असे बंधन आले. त्यातून किती शेतकऱ्यांचा फायदा होणार हा प्रश्नच आहे. कांद्याला जीवनावश्यक वस्तूंमधून वगळून त्याच्या मुक्त व्यापाराला परवानगी द्यावी असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. हे धोरण केंद्राच्या हातात आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आलेले असताना मोदींनी त्यावर बोलणे अपेक्षित होते. पण ते न करता मोदींचे पोलिस शेतकऱ्याला पकडून नेतात यावरूनच ही राजवट किती जुलमी आहे हे लक्षात यावे. यालाच विरोध करण्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना एकत्र आले आहेत. मोदींनी आपल्या भाषणात आता निर्यात सुरू झाली आहे वगैरे दावे केले. काँग्रेस राजवटीपेक्षा आमच्या काळात कशी निर्यात वाढली आहे हेही सांगितले. पण गेल्या दहा वर्षात मोदी सरकारने निर्यातबंदी करून शेतकऱ्यांचे शेकडो कोटी रुपयांचे नुकसान केले आहे हीदेखील वस्तुस्थिती आहे. त्यावर मोदी गप्प राहिले.

### हिंदुत्ववादीही वैतागले

मोदींनी कल्याणच्या सभेमध्ये पुन्हा एकदा खोटारडेपणा केला. काँग्रेसला देशाचा पंधरा टक्के अर्थसंकल्प मुसलमानांसाठी राखून ठेवायचा आहे असे ते म्हणाले. या सर्व आरोपांचे नीट खंडन झालेले आहे. २००६ च्या मनमोहनसिंगांच्या ज्या भाषणाचा मोदी सातत्याने दाखला देतात त्यात सिंग यांनी देशाच्या संपत्तीवर पहिला अधिकार मागास, दलित, ओबीसी, महिला व सर्व अल्पसंख्याक गरीब यांचा आहे असे म्हटले होते. मुस्लिमांचा त्यात उल्लेखदेखील नव्हता. काँग्रेसच्या यंदाच्या जाहिरनाम्यातही कोठेही तसे म्हटलेले नाही. तरीही मोदी पुन्हा पुन्हा तेच खोटे बोलत आहेत. पंतप्रधानपदी असलेल्या व्यक्तीने असे बोलणे हे त्या पदाची पुरती लाज घालवण्यासारखे आहे. तरीही मोदी हे सतत का बोलत आहेत हे लक्षात घ्यायला हवे. गेल्या दहा वर्षातला कारभार आणि विशेषतः महाराष्ट्रात वाटेल तशी केलेली राजकीय फोडाफोडी यामुळे भाजपचा कट्टर मतदारही त्याच्यापासून दुरावला आहे. यंदा पहिल्या चार फेऱ्यांमध्ये मतदान कमी होण्याचे ते प्रमुख कारण आहे. या मतदाराला पुन्हा एकदा हिंदुत्वाच्या आणाभाका घालून आपल्याकडे टिकवण्याची मोदींची केविलवाणी धडपड सुरू आहे. अर्थात, महाराष्ट्रातला हिंदुत्ववादी मतदार हा उत्तर भारतातल्या गायपट्ट्यातल्या प्रमाणे नाही. निवडणूक जिंकण्यासाठी आपला नेता पुन्हापुन्हा खोटारडेपणा करतो आहे हे त्याला मानवणारे नाही. आणि, मोदी तर खोटे सोडून दुसरे काहीच बोलत नाहीत. गेल्या दहा वर्षातल्या आपल्या कामगिरीबाबत ते चकार शब्द काढत नाहीत. काँग्रेस कशी मुस्लिमांना झुकते माप देते आहे याची काल्पनिक वर्णने करण्यातच त्यांचा वेळ चालला आहे. किंबहुना, याखेरीज त्यांच्याकडे दुसरे काहीच नाही. हा बोलभांडपणा आणि खोटेपणा जाहीर सभेत उघड करणाऱ्या नाशिकच्या त्या शेतकऱ्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडे आहे. आजवर मोदींच्या सभेत काळे कपडे घालून जाणाऱ्यांना देखील बंदी होती. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी निषेधाचा जाहीर आवाज उठवला आहे हे महत्वाचे आहे. हा निषेध मतपेटीतूनही व्यक्त होईलच.

विचार

# एसआयपी फळाला, चिंता इतरांना

**अलिकडेच एसआयपीमध्ये एकाच महिन्यात वीस हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याचा तपशील समोर आला. याच सुमारास कर्मचारी कपातीने तेल कंपन्यांना नफा झाल्याची माहिती आकडेवारीसह जाहीर झाली. दरम्यान, कांद्याचे निर्यातमूल्य कमी करून पाकिस्तानने भारताला शह दिल्यामुळे कांदा उत्पादक आणि व्यापाऱ्यांपुढील आव्हानांमध्ये भर पडली. याच काळात डाळींचे दर कडाडले.**

महेश देशपांडे

एसआयपीमध्ये एकाच महिन्यात वीस हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याचा तपशील समोर आला आहे. याच सुमारास कर्मचारी कपातीने तेल कंपन्यांना नफा झाल्याची माहिती आकडेवारीसह जाहीर झाली आहे. उद्योगविश्वातली ही बरकत समोर येत असतानाच व्यापारीवर्गापुढील नवी समस्या समोर आली आहे. कांद्याचे निर्यातमूल्य कमी करून पाकिस्तानने भारताला शह दिल्यामुळे कांदा उत्पादक आणि व्यापाऱ्यांपुढील आव्हानांमध्ये भर पडली आहे. दरम्यान, याच काळात डाळींचे दरही कडाडले आहेत.

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक 'एसआयपी'ने (सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) एप्रिल महिन्यात प्रथमच २० हजार कोटी रुपयांची पातळी ओलांडली. या महिन्यात २० हजार ३७१ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. 'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड ऑफ इंडिया' (एएमएफआय) च्या मासिक अहवालानुसार, देशातील इक्विटी म्युच्युअल फंडातील गुंतवणूक १६.४२ टक्क्यांनी वाढली. ती १८ हजार ९१७.०८ कोटी रुपये झाली. लार्ज कॅप फंडांमध्ये घसरण झाली तर स्मॉल कॅप फंडात २,२०८.७० कोटी रुपयांची नवी गुंतवणूक करण्यात आली. 'एएमएफआय'च्या मते मार्चमध्ये 'एसआयपी'तील गुंतवणूक १९ हजार २७१ कोटी रुपये होती. एका महिन्यात एकूण गुंतवणुकीत ५.२४ टक्के वाढ झाली आहे. म्युच्युअल फंडाची एयूएम ५७.२६ लाख कोटी रुपये झाली. एसआयपी गुंतवणूकदारांची संख्या आठ कोटी ७० लाख झाली आहे. मार्चमध्ये ही संख्या आठ कोटी ४० लाख होती. इक्विटी फंड सलग ३८ व्या महिन्यात पॉझिटिव्ह झोनमध्ये राहिले असले तरी लार्जकॅप फंडातील गुंतवणूक ३८ टक्क्यांनी कमी झाली. त्या तुलनेत मिडकॅप फंडातील गुंतवणूक ७६.१९ टक्क्यांनी वाढली. एप्रिलमध्ये त्यात १,७९३ कोटी रुपयांची नवी गुंतवणूक झाली. मार्चमध्ये स्मॉल कॅपमध्ये ३० महिन्यांमध्ये प्रथमच घसरण झाली. एप्रिलमध्ये डेट फंडात १.९० लाख कोटींची नवीन गुंतवणूक करण्यात आली असून, मार्चमध्ये एकूण गुंतवणूक एक लाख ९८ हजार कोटी होती. त्यातील १.०३ लाख कोटी रुपये लिक्विड फंडात आले.

दरम्यान, सरकारी तेल आणि वायू कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. कर्मचाऱ्यांची संख्या कमी केल्यामुळे नफ्यामध्ये मोठी वाढ झाली. सहा वर्षांपूर्वी कर्मचाऱ्यांची संख्या एक लाख दहा हजार होती. ही संख्या सध्या ९४ हजार तीनशे इतकी कमी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार गेल्या काही वर्षांमध्ये उत्पादन, विपणन, संशोधन आणि विकास क्षेत्रातील नोकऱ्या २० ते २४ टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या संख्येत घट झाल्यानंतर तेल कंपनीच्या नफ्यात दुप्पट वाढ झाली आहे. सहा वर्षांमध्ये कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांमध्ये १४ टक्क्यांची म्हणजेच १५ हजार ७०० इतकी घट झाली. तेल कंपन्या सध्या मोठ्या नफ्यात आहेत. एका अहवालात दिलेल्या माहितीनुसार व्यवस्थापकीय क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये सहा टक्क्यांची घट झाली तर पर्यवेक्षक, लिपिक आणि कामगारांसह गैर व्यवस्थापकीय नोकऱ्यांमध्ये २५ टक्क्यांची घट झाली. संशोधन क्षेत्रातील नोकऱ्या १६ टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. उत्पादनक्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये पाच टक्क्यांची घट झाली. मागील सहा वर्षांमध्ये तेल कंपन्यांनी रोजगारासाठी सहा साख ८० हजार कोटी रुपये खर्च केले आहेत.

तेल कंपन्यांना कौशल्य असलेल्या लोकांची गरज असते. त्यामुळेच कुशल उमेदवारांनाच कंपनी कामावर ठेवते. अन्यथा, लोकांना कामावरून कमी केले जात आहे. 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन'मध्ये २८ हजार कर्मचारी होते, 'ऑईल अँड नॅचरल गॅस कमिशन'मध्ये २४ हजार कर्मचारी होते. एकूण नोकऱ्यांमध्ये अधिकारी किंवा व्यवस्थापकांचा वाटा 'इंडियन ऑइल'मध्ये ५८ टक्के तर 'ओएनजीसी'मध्ये ६० टक्के होता. म्हणजे व्यवस्थापकांचा वाटा जास्त होता. मिळालेल्या माहितीनुसार तेल कंपन्या सध्या मोठ्या नफ्यात आहेत. देशातील तीन तेल कंपन्यांना ८२ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक नफा झाला आहे. चौथ्या तिमाहीमध्ये तिन्ही कंपन्यांचा नफा ५० टक्क्यांनी घटला आहे. त्या आधीच्या तिमाहीमध्ये तिन्ही कंपन्यांचे नफ्याचे प्रमाण हे ६९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. दरम्यान, चालू आर्थिक वर्षात तेल कंपन्यांचा नफा ९० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे.

सध्या कांद्याच्या मुद्यावरून देशातील वातावरण गरम आहे. बाजूला कांदा निर्यात मूल्यावरून शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटना सरकारवर टीका करीत आहेत. भारताने तब्बल पाच महिन्यांनंतर कांदा निर्यातबंदी मागे घेण्याचा निर्णय घेतला. भारताच्या या निर्णयानंतर पाकिस्तानने मोठा निर्णय घेऊन भारताच्या कांद्याला जागतिक बाजारात स्पर्धा निर्माण केली आहे. पाकिस्तानने कांद्यावरील निर्यातमूल्य ७०० डॉलर प्रति टनावरूनन ३२५ डॉलर प्रति टन केले आहे. मागील वर्षी म्हणजे डिसेंबर २०२३ मध्ये भारताने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ही बंदी ३१ मार्चपर्यंत असल्याचे सरकारने त्या वेळी सांगितले होते. मार्च महिन्यात सरकारने कांदा बंदी उठवली नाही. सरकारने तीन मे रोजी कांद्यावरील बंदी उठवली; मात्र, ही बंदी उठवताना सरकारने काही अटी, शर्ती घातल्या. यामध्ये भारताने प्रत्येक मेट्रिक टन कांद्यासाठी ५५० डॉलर इतके किमान निर्यातमूल्य लावले आहे तर ४० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. यानंतर पाकिस्तानने मोठा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानने कांद्यावरील निर्यातमूल्य ७०० डॉलर प्रति टनावरुन ३२५ डॉलर प्रति टन केले आहे.

दरम्यान, सध्या कांदा निर्यात मूल्यावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये चांगलीच चढाओढ सुरु आहे. पाकिस्तानने हा निर्णय जाणीवपूर्वक घेतला आहे. त्यांच्या या निर्णयानंतर आता भारत आणि पाकिस्तानदरम्यान एक प्रकारची स्पर्धा लागली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्रासह देशात कांद्याच्या मुद्यावरून वातावरण चांगलेच तापले आहे. सरकारने कांदा निर्यातबंदी केल्यामुळे शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटनांनी मोठा विरोध केला होता. या विरोधानंतरही सरकारने कांदा निर्यातबंदी कायम ठेवली होती. आता मात्र, अनेक शेतकऱ्यांकडे कांदा शिल्लक नाही. अशा स्थितीत सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील बंदी हटवली आहे; मात्र ही बंदी हटवताना काही अटी शर्ती लागू केल्या आहेत. त्यामुळे शेतकरी आक्रमक झाले आहेत. निर्यातीला परवानगी द्यायची असेल, तर कोणत्याही प्रकारच्या अटी न घालता परवानगी द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

आता एक महत्वाची नोंद. सरकार लोकसभा निवडणुकीच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रणात ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत असले, तरी अनेक वस्तूंच्या किंमती वाढत आहेत. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. सध्या डाळींचे भाव गगनाला भिडले आहेत. दरात सातत्याने वाढ होत आहे. वर्षभरात तुरीच्या डाळीच्या किमतीत ३१ टक्क्यांची वाढ झाली, तर मसूर डाळीच्या दरात १५ टक्क्यांची वाढ झाली. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे. वर्षभरात मोठ्या प्रमाणात डाळींच्या दरात वाढ झाली. सर्वसामान्य जनतेला याचा मोठा फटका बसत आहे. सध्या निवडणुकांचा काळ आहे. या काळात महागाई वाढू नये म्हणून सरकार प्रयत्न करत आहे. दरम्यान, व्यापाऱ्यांकडून डाळीचा अनावश्यक साठा झाला असल्याची भीती सरकारला वाटत आहे. त्यामुळेच बाजारात डाळीचा तुटवडा होत असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, बाजारात डाळींचा तुटवडा भासल्यामुळे मागणीप्रमाणे पुरवठा होत नाही. त्यामुळे दरात वाढ होत आहे. बाजारात डाळींचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे बाजारात डाळीचा पुरवठा वाढवण्याचे आव्हान सरकारपुढे आहे. अन्यथा दरात वाढ आणखी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, व्यापाऱ्यांसह किरकोळ विक्रेत्यांना डाळींच्या साठ्याबाबत नियमीत माहिती देण्याची विनंती सरकारने केली आहे.

भारतात जेवणात तूर डाळ आणि उडदाच्या डाळीचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यामुळे त्याच्या मागणीत सातत्याने वाढ होत आहे. दरम्यान, डाळींच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर सरकार देशातील डाळींचे उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. डाळवर्गीय पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देत आहे. आपला देश इतर देशांकडून मोठ्या प्रमाणात डाळींची आयात करतो. यामध्ये टांझानिया, मोझांबिक आणि म्यानमार या देशांचा समावेश आहे. देशांतर्गत डाळीची गरज पूर्ण करण्यासाठी आयात करणे गरजेचे आहे. दरम्यान, डाळींच्या वाढत्या दराचा परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होताना दिसत आहे. सरकार या निवडणुकीच्या काळात सामान्य नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न करत असतानाच दुसऱ्या बाजूला डाळींच्या दरात वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे या डाळींच्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर सरकार आता नेमका काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आजकाल

# मोदीजींच्या मुंबईतील 'रोड शो'निमित्त दोन गोष्टी...

आनंद भंडारे

पहिली. यातील 'शो' हा शब्द महत्वाचा! कारण काहीही झालं तरी 'शो मस्ट गो ऑन' हेच आपल्या जीवनाचे इप्सित आहे, असे कुठल्याही अभिनेत्याला वाटतं. आपल्या मोदीजींचंही तसंच आहे. मागे जबलपूरमधील अशाच एका रोड शोमध्ये मोदीजींसमोरच छप्पर कोसळून लोकं खाली पडली. पण मोदीजींनी जणू काही घडलंच नाही अशा निर्विकार चेहऱ्याने 'शो मस्ट गो ऑन' म्हणत तो रोड शो पूर्ण केला. पुलवामात लष्कराच्या बसवर अतिरेकी हल्ल्यात ४० जवान शहिद झाले. तेव्हा आपले लाडके मोदीजी बीअर ग्रील्ससोबत उत्तराखंडमधल्या जीम कॉर्बेट जंगलात शूटींग करत होते. त्यावेळीही आपल्या मोदीजींनी 'शो मस्ट गो ऑन' म्हणत आधी आपलं शूटींग पूर्ण केलं. अमेरीकेत ९/११ झालं तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश एका शाळेतील कार्यक्रम अर्धवट टाकून तडक वॉशिंग्टनला निघून गेले होते, हा आता भूतकाळ झाला! परवाचा घाटकोपरमधील होर्डींग कोसळण्याचा प्रकार अतिशय क्लेषदायकच. असा अपघात पुन्हा कधीही होवू नयेच. पण मोदीजींच्या रोड शो मध्ये असं काही झालंच असतं तर मला खात्री आहे की आपल्या मोदीजींनी त्याही वेळेस 'शो मस्ट गो ऑन' म्हणत रोड शो पूर्ण केलाच असता! शेवटी राष्ट्र प्रथम!

आता दुसरी गोष्ट. २०१९च्या लोकसभा निवडणूकीत मुंबईतून गोपाळ शेट्टी, मनोज कोटक आणि पूनम महाजन हे मोदीजींचे तीनही खासदार भरघोस मतांनी निवडून आले होते, बीना मोदीजींच्या रोड शोचे! मात्र या तीनही खासदारांची तिकीटे कापून तिथे यंदा नवीन उमेदवार मोदीजींनी दिले आहेत. का? कारण हे तीनही खासदार मतदारांशी संपर्क ठेवण्यात, मतदारांना उपलब्ध असण्यात, मिळालेला निधी योग्य प्रमाणात वापरण्यात अपयशी ठरलेले आहेत. थोडक्यात, मोदीजींच्या विकासाच्या कार्यकाळात मुंबईतील त्यांचेच तीनही खासदार नापास ठरले.



आता त्यांच्या जागी तीन नव्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मोदीजी रोड शो करणार आहेत. मुद्दा असा आहे की मोदीजींचे मुंबईतील तीनही खासदार नापास ठरलेले असताना पुन्हा नव्या उमेदवारांसाठी मोदीजींनी मते मागायला यायचंच कशाला? त्यापेक्षा या तीनही जागा आपल्या मित्र पक्षाला देणं जास्त योग्य झालं नसतं का? आणि या नापास झालेल्या उमेदवारांच्या मतदारांनीही पुन्हा आता मोदींच्या नव्या उमेदवाराला का म्हणून मत द्यावे? हे नवीन उमेदवारही नापास होणार नाहीत याची मोदीजी गॅरंटी देत आहेत का?

यावर भक्त मंडळी म्हणतील की पण मोदीजींनी नापास उमेदवार तर बदललाच ना, अशी हिंमत इतरांमध्ये आहे का? हे म्हणजे आपली गेलेली लाज झाकायची आणि इतरांच्या बेटकुळ्या शोधायच्या. भक्तांच्या लॉजिकला काहीही तोड नाही. एकीकडे यश मिळालं तर मोदीजी एकटेच कसे सगळ्यांना पुरून उरतात म्हणणार आणि दुसरीकडे देशातील वारे बदलताहेत याचा अंदाज आल्यामुळे एनडीएची जुळवाजुळव करावी लागली. अगदी नामांकनासाठीसुध्दा १२ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना एका गाडीतून कोंबून आणावं लागलं. तर म्हणे पहा, मोदीजी कसे सगळ्यांना बरोबर घेतात. 'थ्री इडियट्स'मध्ये कँपस जॉबसंदर्भात विरू सहस्त्रबुध्दे अर्थात वायरसचे एक वाक्य आहे. राजू रस्तोगी आणि फरहान कुरेशी यांना जॉब मिळणार नाही कारण ते पासच होणार नाहीत. त्यांचे मेंदू बाहेर मार्केटमध्ये विकले तर त्याला चांगली किंमत मिळेल. कारण ते आहेत! भक्तांचेही गेली दहा वर्षे आहेत! असो.

तर या अशा आपल्या अभि'नेत्या' मोदीजींचे आपण एक मुंबईकर म्हणून स्वागत करूया आणि 'शो मस्ट गो ऑन' म्हणत तो रोड शो रेटण्याची त्यांना पुन्हा संधी मिळेल, अशी आपत्ती त्या दरम्यान घडू नये, यासाठी प्रार्थना करूया!

लोकसंसद

### राजकारणात सुद्धा वयाची मर्यादा हवी

पहिल्या लोकसभेतील खासदारांचे सरासरी वय ४६. ५ एवढे होते .त्यात प्रत्येक लोकसभेच्या वेळी वाढ होत ते सतराव्या लोकसभेत ५५.५ एवढे झाले आहे. दहाव्या लोकसभेच्या वेळी ते ५१. ४ एवढे होत्ते ही बातमी नुकतीच वाचली भारत हा चिरंतरुणांचा देश असे म्हटले जाते. मात्र येथे चित्र वेगळेच दिसत आहे . प्रत्येक लोकसभेच्या वेळी सरासरी वय वाढत चालल्याचे दिसते. आज लोकसभेत किंवा विधानसभेत निवडणूक लढविण्यासाठी किमान वयोमर्यादा आहे पण कमाल मर्यादा नाही. सतराव्या लोकसभेत जास्तीत जास्त वयाचे खासदार म्हणून समाजवादी पक्षाचे शफीगुर रहमान बरक हे होते. त्यांचे वय ८९ एवढे होते. सोळाव्या लोकसभेत बीजीपीचे खासदार लालकृष्ण अडवाणी ही होते त्यांचे वय त्यावेळी ८६ वर्षाचे होते. आज प्रत्येक क्षेत्रात सेवानिवृत्तीचे वय आहे. मात्र राजकारणात म्हणजेच विधानसभा किंवा लोकसभा यात वयाचे बंधन नाही वास्तविक पाहता वयोमानाप्रमाणे माणसाची कार्यशक्ती कमी होत जाते. हाच सेवानिवृत्ती मागील हेतू असावा. याशिवाय वयाचे बंधन न ठेवल्यास तरुणांना सुद्धा संधी कमी मिळू शकतात. आज सर्वसाधारणपणे तरुणापेक्षा जास्त वय असलेले नेते जास्त मुरब्बी असतात असे म्हटले जाते तरीही निवडणूक लढविण्यावर कमाल वयाचे काही तरी बंधन हवे असे वाटते. - शांताराम वाघ, पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१७ मे**

**१८४६:-** पहिले मराठी वृत्तपत्रकार, निबंधकार व भाषांतरकार, गणिताचे जाणकार आणि शिक्षण-तज्ज्ञ बाळशास्त्री जांभेकर यांचे वयाच्या अवघ्या ३५व्या वर्षी निधन. या अल्पायुष्यात प्राचीन लिप्यांचा अभ्यास करुन त्यांची कोकणातील शिलालेख व ताम्रपटांबल निबंध लिहिले होते. विद्यार्थ्यांसाठी 'नीतिकथा', 'भूगोलविद्या', 'बाल-व्याकरण' ही पुस्तके लिहिलीच, परंतु शिक्षकांसाठी 'शिक्षारीती' हे पुस्तकही लिहिले. ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे वृत्तपत्र व्यवसायाचा पाया रचणाऱ्या या विद्वानाने 'हिंदुस्थानचा इतिहास' आणि 'मानसशक्तीविषयीचे लेख' हे ग्रंथही लिहिले होते. मराठी वृत्तपत्रव्यवसायाचे 'जनक' या उपाधीने ते प्रसिध्द. **१८६५:-** 'रियासतकार' गोविंद सखाराम सरदेसाई यांचा जन्म. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या मुलाचे शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी काढलेल्या टिपणांतून 'रियासतीं'चा जन्म झाला. 'मुसलमानी रियासत', 'मराठी रिसायत आणि ब्रिटिश रियासत', हा ८५० वर्षांचा काळ त्यांनी १३ खंडांत मांडला. 'पेशवे दप्तर' (४५ खंड), 'पूजा रेसिडेन्सी कॉरस्पॉडन्स (५ खंड) असे एकंदर १०५ ग्रंथ व २७५ लेख त्यांनी आयुष्यभरात केले होते. 'रियासत'कारांनी विद्यार्थ्यांसाठी 'भारतवर्ष', 'बालोपयोगी महाराष्ट्राचा इतिहास', 'महाराष्ट्राच्या इतिहासाच्या सोप्या गोष्टी', 'हिंदुस्थानचा प्राथमिक इतिहास' अशी पुस्तके लिहिली. तसेच काव्येतिहास संग्रहातील पत्रे, यादया, भारतवर्ष व इतिहास संग्रहातील महत्त्वाच्या कागदपत्रांचे संपादन केले. तसेच 'कवी परमानंदांच्या अनुपुराणाचे ही त्यांनी संपादन केले. याखेरीज 'माझीसंसारयात्रा' हे आत्मचरित्र, सयाजीराव महाराजांच्या आठवणींचे पुस्तक व आपल्या दिवंगत मुलाचा निवडक पत्रांचा संग्रह 'श्यामकांताची पत्रे' त्यांनी प्रसिध्द केली. **१८७८:-** साहित्यसमीक्षक, कवी, कथाकथनकार व महानुभवी ग्रंथाचे संपादक असा मराठी साहित्यात ठसा उमटवणाऱ्या नीळकंठ बळवंत भवाळकर उर्फ बापूसाहेब यांचा जन्म. साहित्याची आवड उपजत असणाऱ्या भवाळकरांनी कॉलेजात असतानाच 'मणिमंजुषा' या नावाने साहित्यविषयक संस्था सुरु केली होती. साहित्याच्या क्षेत्रात 'विविधज्ञानविस्तार' ह्या मासिकातून केशवसुतकालीन काव्यविषयक तात्त्विक विचार मांडणारी कविता, तिचे स्वरुप आणि अध्ययन यावरील प्रदीर्घ लेखमाला गाजली. याशिवाय 'पद्यपद्याकार' हा काव्यसंग्रह, 'बेहेन पिरोजफ ही कादंबरी आणि 'श्रीचक्रधर सिध्दांतसूत्रे', 'लक्षणान्वय सूत्रपाठ', 'श्रीसर्वज्ञ श्रीचक्रधरनिरुपित दृष्टांतपाठ' या ग्रंथाचे सांगोपांग संपादन केले. त्यांची आणखी एक उल्लेखनीय वाड्:मयीन कामगिरी म्हणजे विविधज्ञान विस्तारच्या प्रारंभीच्या पन्नास वर्षातील लेखनाची क्रमवारी सूची व मध्यप्रदेशातील ७५ वर्षाची वाड्:मय सूचीची निर्मिती, आयुष्याच्या अखेरची १७ वर्षे कॉलेज ऑफ आर्टस फॉर वुइमेनमध्ये अध्यापन करणारे भवाळकर २४ मे १९४२ रोजी निधन पावले. **१९२१:-** लेखक माधव गोपाळ आडकर यांचा जन्म. 'जीवन तरंग' हे पुस्तक त्यांनी लिहिले. **१९३२:-** भारताचे गृहमंत्री मा. श्री. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या इंग्रजी आत्मचरित्राचा 'चिंतन आणि संस्मरण' असा मराठी अनुवाद करणारे लेखक व कथाकार डॉ.चंद्रकांत देऊळगावकर यांचा जन्म. 'मन्मथस्वामी व्यक्ती आणि वाड्:मय' हा त्यांचा प्रबंध पुस्तक प्रसिध्द तसेच 'आनंदाचे डोही'(लेखसंग्रह), साहित्य श्रिया हे संपादन आणि 'घरटे' या कथासंग्रहासह कुमारांसाठी 'चंद्रावरील कलंक व इतर गोष्टी', 'सानिया', 'परोपकारी विठू', 'असीम त्याग' हे चार कथासंग्रह तसेच बी.ए ला व एम ए ला उपयुक्त 'मराठी निबंध व लघुनिबंध' हे पुस्तक अशी साहित्य संपदा. **१९३३:-** लेखक होमिओपॅथीचे अभ्यासक अशोक श्रीपाद देशपांडे यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'अमृता' फ्रेंच कादंबरीचा अनुवाद तसेच संत नामदेव, संत मीराबाई, संत निळोबाराय, गोंदवलेकर महाराज, डॉ. आंबेडकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई आदींवर त्यांनी कादंबऱ्या लिहिल्या. याशिवाय 'असा लढला बांगला' ही बांगलादेश मुक्तिसंग्रामाची कहाणी. 'आराम हराम है' ही नाट्यछटा, 'उघडं गुपित', 'नवऱ्याला हवी पोटगी' ह्या नाटिका, याखेरीज 'युध्दकथा' बालसाहित्यासह शालेय दिनविशेष हा ग्रंथ आणि होमिओपॅथीवर 'रोगनाशक होमिओपॅथी', 'होमिओ प्रथमोपचार' अशी ग्रंथसंपदा. **१९३६:-** लेखक संत चिंधूभाऊ दागोजी मुंगुलमारे यांचा जन्म. 'आत्मस्वरुप अभंगवाणी' हा अभंगसंग्रह त्यांचा प्रकाशित झाले आहे. **१९४४:-** कथालेखक शिवाजी सावळाराम बावणे यांचा जन्म. यांचा 'वाकळ' हा ग्रामीण कथासंग्रह प्रसिध्द. **१९५४:-** कवी रंगनाथ सीताराम रायपुरे यांचा जन्म. 'वास्तवकळा' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रसिध्द झाला आहे. **२०१४:-** लेखक आणि हवाई छायाचित्रण हा प्रकार देशात लोकप्रिय करणारे ख्यातनाम छायाचित्रकार गोपाळ बोधे यांचे निधन. त्यांच्या नावावर काही पुस्तकेही ती अशी:-१) शेगावचे गजानन महाराज मंदिर व परिसर यावरील 'मानवतेचे मंदिर' २) मुंबई ते गोव्याचे हवाई छायाचित्रे असलेले 'अ व्ह्यू फ्रॉम हेवन्स' आणि ३) अलिकडेच त्यांचे सिध्दीनायक मंदिरावरील कॉफी टेबल पुस्तकही प्रकाशित झाले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# अवकाळी पावसामुळे दुबार भातशेती संकटात

। रोहा । वार्ताहर ।

तालुक्यातील उन्हाळी रब्बी हंगामाच्या पिकाला अवकाळी पावसाने झोडपले. त्यामुळे बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसामुळे त्याचे नुकसान होताना दिसत आहे. शेतकरी बळीराजा अधिक संकटात सापडला जात आहे. मागील काळात आधी कोरोना मग चक्रीवादळ, तौक्ते वादळ त्यामुळे काही ना काही संकटे बळीराजाच्या मागे कायम आहेतच त्यातुनच शेतकरी सावरतो ना सावरतो तोच पुन्हा या वर्षीच्या उन्हाळी भात पिकाला अवकाळी पावसाच्या रूपातून तडाखा पुन्हा बसत असल्याने आता बळीराजा चिंतेत पडला आहे.

गेली दोन तीन दिवस तालुक्यातील कोलाड, खांब, वरसगावसह काही भागात वादळ वाऱ्यासह तुफान पडलेल्या अवकाळी पावसाने शेतकरी वर्गाची अधिक चिंता वाढवत बळीराजा संकटात सापडला आहे.



रोहा तालुक्यातील कोलाड-खांब, तिसे परिसरातील शेतकऱ्यांचे या तुफान पडलेल्या अवकाळी पावसामुळे कापून ठेवलेल्या भातशेतीचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गुरांच्या वैरणीचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या भातशेतीचे त्वरीत पंचनामे करावे अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

तालुक्यातील कोलाड, महादेववाडी, हेटवणे, वरसगाव, चिंचवली, तिसे, पुई, गोवे, मूठवली, शिरवली, पुगांव, खांब, नडवली या परिसरातील शेतकरी कुंडलिकेच्या डोळवहाल चिंचनातून व कोलाड पाटबंधारे विभागाच्या कालव्याच्या पाण्यावर दुबार भात शेतीचे पीक घेतले जाते. तर पिकवली जाणाऱ्या भातशेतीचे गेली दोन दिवस दुपारनंतर पडलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. या परिसरातील भातशेती ही कोलाड पाटबंधारे विभाग यांच्या मार्फत सोडण्यात येणाऱ्या कालव्याच्या पाण्यावर केली जाते. ते पीक देखील चांगले आले. त्याची कापणी बांधणी मळणीचे काम शेतकरी यांच्याकडून सुरू आहे. मात्र अवकाळी होत असलेल्या पावसामुळे मोठे नुकसान होत असताना दिसत आहे.

गेली काही दिवस उष्णतेचा पारा ४२ अंशाहुन अधिक असल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. त्यात सोमवारी, मंगळवार, बुधवारीदेखील पावसाने हुकूमत गाजवत गुरूवारीदेखील आभाळ वातावरण ढगाळ असल्याचे दिसून येत होते. पुन्हा अचानक वादळी वाऱ्यासह रोहा तालुक्यातील कोलाड आणि परिसरात खांब, कोलाड, वरसगाव, तिसे, तळवली परीसरात अवकाळी पावसाने जोरदार तडाखा देत पर्जन्यवृष्टी केली तसेच मुंबई गोवा मार्गालगतच्या गाव हद्दीत जोरदार पाऊस झाला असल्याने उन्हाळी भात पीक तसेच आंबे, काजू फळबगा तसेच रानमेव्याचे मोठे नुकसान झाले आहे.

येथील कालव्याच्या पाण्यावर केली जाणारी भातपीके उत्तम प्रकारे आली. पावासाला सुरु होण्यास पंधरा ते वीस दिवस शिल्लक असल्यामुळे या विभागातील शेतकऱ्यांनी भातशेतीची कापणी, बांधणी केली केली. परंतु अवकाळी आलेल्या तौक्ते चक्रीवादळ व तुफान झालेला पाऊस यामुळे कापून बांधून ठेवलेल्या भातपीकात पाणीच पाणी साचल्याने भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. याबरोबर पावसाला हंगामात चार महिने पुरणारी गुरांची वैरण अथवा चारा भिजल्यामुळे गुरांच्या वैरणीचा प्रश्नही बळीराजा समोर गंभीर बनला आहे .

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ मे
१) श्री. प्रभाकर बाळाराम इंदुलकर
चेंढरे- अलिबाग, १७-५-१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



श्रीमती राधिका दामोदर नांदगावकर,
स्मरणार्थ, बोर्ली मांडला,
मुरुड जंजिरा

## ट्रकची ट्रेलरला धडक ;एकाचा मृत्यू

**खोपोली :** मुंबई पुणे एक्स्प्रेस वेवर एका ट्रकने ट्रेलरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रकच्या केबिनमध्ये अडकून चालकाचा जागीच मृत्यू झाला. मुंबई पुणे एक्स्प्रेस वेवरून पुण्याहून मुंबईकडे दोन्ही वाहने जात असताना ती बोरघाटात आली असता आडोशी येथील नवीन बोगद्यात ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रेलरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस, अपघातग्रस्त टीमचे सदस्य, आयआरबी यंत्रणा, देवदूत यंत्रणा आदी घटनास्थळी तात्काळ दाखल होत ट्रकमध्ये अडकेल्या चालकाला बाहेर काढले.

## सुधागड तालुक्यात जोरदार पाऊस

**पाली:** गुरुवारी दुपारनंतर वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे सुधागड तालुक्यातील खुरावले वाघोशी रस्त्यासह इतर भागात झाडे उन्मलून पडली. खुरावले वसुधा सोसायटीजवळ रस्त्यात एक झाड कोसळल्याने वाहतूक काहीकाळ बंद होती.नागरिकांच्या मदतीने रस्त्यात पडलेले झाड बाजूला करण्यात आले.

जोरदार पावसामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचले आहे. पावसामुळे वातावरणातदेखील बदल होऊन हवेत गारवा निर्माण झाल्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून काहीकाळ मुक्तता मिळाली. अवकाळी पावसामुळे मान्सूनपूर्व शेती मशागतीची कामे अपूर्ण राहिली असून शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे. बऱ्याच शेतकऱ्यांच्या शेतात राब देखील जाळण्यात आला नाही. गुरूवारी झालेल्या जोरदार पावसामुळे विटभट्टी व्यवसायिकांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. बऱ्याच वीटभट्टी व्यवसायिकांच्या भट्ट्या पावसाने भिजल्या गेल्या आहेत. काहींनी पेटवलेल्या भट्ट्या पावसाम ुळे भिजल्या गेल्या असून भट्टीत रचलेला कोळसा व तूस भिजले गेले असल्याने मोठे नुकसान झाले आहे.

## पावसानंतर माथेरान काळोखात

। नेरळ । प्रतिनिधी ।




माथेरानमध्ये वादळी पावसानंतर अवकाळीसह गारपीट पाऊस आला. त्यात वादळी पावसाने अनेक झाडे कोसळत होती. त्यामुळे माथेरानमध्ये तब्बल दोन दिवस वीज गायब होती.वीज गायब असल्याने पाणीदेखील माथेरानमध्ये पोहचले नाही आणि त्यामुळे माथेरानम ध्ये पर्यटक देखील माथेरानकडे फिरकत नाहीत अशी स्थिती झाली आहे.

माथेरानमध्ये गारपीट ग्रस्त पाऊस आणि अवकाळी सोबत वादळी वाऱ्याने माथेरान जंगलात असंख्य झाडे कोसळली आहे. त्यामुळे माथेरान घाटात अनेक ठिकाणी विजेचे खांब कोसळले आहेत आणि त्यानंतर वीज गायब झाली होती. वीजपुरवठा खंडित झाल्याने माथेरानमध्ये जवळपास सर्वच व्यवहार ठप्प झाले आहेत.वीज नसल्याने माथेरानचा पाणीपुरवठा येथील बँकिंग व्यवहार, नेटवर्क आदींवर परिणाम झाला. त्याचा फटका येथील नागरिकांसह व्यापारी आणि पर्यटकांना सहन करावा लागला. माथेरानमध्ये वीज आणि त्यानंतर पाणीदेखील गायब असल्याने माथेरानमधील पर्यटन व्यवसाय धोक्यात आला आहे.


सध्या तीव्र उन्हाळा असून माथेरानमध्ये पर्यटनासाठी असंख्य पर्यटक भेट देत आहेत. त्यात येथे अनेक करमणुकीचे कार्यक्रम असल्याने पर्यटकांची वर्दळ माथेरानमध्ये पाहवयास मिळाली. मात्र १३ आणि १४ मे रोजी येथे आलेल्या अवकाळी पावसात गारपीट झाली असून जवळपास अर्धा तासात २३ मिलीमीटर पाऊस झाला.

## तलाठी कार्यालयाचे पत्रे उडाले; दस्तावेज सुरक्षित

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तहसील कार्यालयाचे तलाठी सजा असलेले कोटिंबे येथील तलाठी कार्यालयाची सर्व पत्रे आलेल्या चक्री वादळाने उडून गेली आहेत. मात्र तेथील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान दाखवल्याने महत्वाची कागदपत्रे सुरक्षित आहेत.

कशेळे मंडळ अधिकारी कार्यालयाशी संबंधित तलाठी सजा कोटिंबे गावात आहे. या गावाच्या बाहेर आंबिवली, धामणी रस्त्यावर तलाठी कार्यालयाची इमारत उभारली आहे. दोन खोल्यांच्या या इम ारतीत कारकून कार्यालय आणि तलाठी यांची केबिन तसेच कागदपत्रे ठेवण्यासाठी कपाटे अशी व्यवस्था आहे. कोटिंबे आंबिवली धामणी रस्त्याच्या



डाव्या बाजूला असलेल्या या तलाठी कार्यालयाला आज १६ मे रोजी आलेल्या वादळी वारा आणि अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले.त्या कार्यालयाच्या इमारतीची दोन्ही खोल्या आणि व्हरांडा यावरील बहुसंख्य पत्रे उडून रस्त्यावर जावून पडली. त्यावेळी कोणतेही वाहन तेथून जात नसल्याने मोठा अपघात झाला नाही. मात्र त्यावेळी तलाठी कार्यालयात असलेले म हसूल कारकून सुनील गायकवाड यांनी तलाठी उमेशकुमार भेरे यांना दूरध्वनी वरून त्याबाबत माहिती दिली.नेरळ येथे अतिरिक्त पदभारचे ठिकाणी असलेले तलाठी भेरे हे तत्काळ कशेळेकडे रवाना झाले. कार्यालयाचे झालेले मोठे नुकसान पाहता महसूल कारकून सुनील गायकवाड यांनी स्थानिक कोटिंबेवाडीमधील तरुणांना मदतीला घेतले. त्या इमारतीत पडलेली सिमेंट पत्रे बाहेर काढले आणि कार्यालयात साचलेले पाणी याकडे न पाहता कार्यालयात असलेली लोखंडी कपाटे हलवली. त्याचवेळी तलाठी यांच्या केबिनमध्ये असलेली सर्व कागदपत्रे हे सुरक्षित ठिकाणी नेण्याचे काम स्थानिकांनी केले.त्यावेळी पाऊस सुरूच होता आणि कर्मचाऱ्यांनी पावसात भिजत सर्व कागदपत्र भिजू न देता तात्पुरता स्वरूपात सुरक्षित ठेवण्याचे काम केले.

पान १ वरुन

### डिमोदीनेशन

करणाऱ्यांना उलट करणार म्हणतात पण मणिपूरमध्ये उलटे कशामुळे झालात? मिंधे तुम्ही दिल्लीश्वरांची चाकरी करत आहात. हे तुमचं हिंदूत्व आहे? हे बाळासाहेबांचे विचार आहेत? प्रफुल्ल पटेलांनी मोदींना जिरेटोप घातला. यावेळेला महाराष्ट्र तुम्हाला आपटणार आहे. ज्याने टोप घातला त्यालाही डोक नाही आणि ज्याने घालून घेतला त्यालाही डोकं नाही.

### वादळी वाऱ्यात शरद पवारांचं भाषण

सरकारने बंद केली आहे. ज्यांच्या हातात सत्ता असते, कांद्यावरील निर्यातबंदी उठवायची ही त्यांचीच जबाबदारी असते. पण, या सरकारला सहन होत नाही. आमचे राज्य होते तेव्हा भाजपचे लोक कांद्याच्या माळा घालून आले होते, शरद पवार होष मे आवो अशा घोषणा दिल्या. त्यावेळी, मी दिल्लीत गेलो अन् कांदा निर्यातबंदी उठवली होती. आताच्या सरकारला त्याची चिंता नाही. कांद्याला भाव नाही, द्राक्षाला भाव नाही, द्राक्ष, डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती वाईट आहे. मात्र, मोदी म्हणतात द्राक्ष,व डाळिंबाला भाव दिले, पंतप्रधान खोटे बोलतात आणि आमच्यावर टीका करत आहेत, असे पवार यांनी म्हटले.

धान्य मोफत देण्याच्या घोषणा करतात आणि शेतकऱ्यांच्या लागणाऱ्या साहित्याची किंमत वाढवली जाते. हा देश धान्य निर्यात करणारा होता, आज आयात करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आम्ही फुकट धान्य देतो अशा गप्पा मारू नका, अशा शब्दात शरद पवार यांनी मोदींवर पलटवार केला. शेतकऱ्याच्या घामाने देशातील धान्याचे गोडवून भरले म्हणून तुम्ही मोफत वाटत आहे. शेतकऱ्यांचे जीवन समृध्द कसे होईल ते बघा. केवळ आमच्यावर टीका करण्यात ते धन्यता मानतात. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करून म्हटले होते काय झाले. दोन कोटी नोकऱ्या देणार होते काय झाले. सत्तेत बसण्याचा अधिकार तुम्हाला, नाही देश संकटातून जातो आहे. देशाचा इतिहास तपासून बघा. यशवंतराव चव्हाण यांनी मिग विमानाचा कारखाना नाशकात उभारला. गांधीच्या विचाराने हा देश चालला पाहिजे इंदिरा गांधी आणि यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराने देश चालला पाहिजे, पण मोदी तसे करणार नाहीत. चीन आपल्या देशात घुसतोय त्याकडे त्यांचे लक्ष नाही. देशाचे रक्षण करायला ठोस पाऊले उचलणे गरजचे आहे, पण मोदी ते करत नाहीत. म्हणून या निवडणुकीत भाजपचा पराभव करा, असेही पवार यांनी म्हटले.

### आज कुरुळ-उसर वाहतूक बंद

अलिबाग ते रोहा बाजूकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना अलिबाग-बेलकडे फाटा-सहाण बायपास मार्गे नागाव-चौलनाका-वावेफाटामार्गे रोहा असे पर्यायी मार्ग आहेत. वाहतुक करण्यात येणाऱ्या सेलची रूंदी आणि उंची जास्त आहे. वाहतुकीच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरीता एमएसईबीकडून योग्य त्या उपाययोजना करण्यात येणार आहेत. ही वाहतूक करताना वाहतूक कोंडी निर्माण होणार असल्याने वाहनचालक व नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होवू नये म्हणून वाहतूक बंदीचा निर्णय घेतला आहे.

### इंडियाच्या फिल्डींगने चिंता वाढवली

समाजाने हेरले होते. त्यातच पेण येथील सुनील तटकरेंच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत भाजपाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर चांगलाचा बॉम्ब टाकला. तटकरेंना मत म्हणजे मोदींना मत असे सांगितले. या एका वाक्याने मुस्लिम समाज चांगलाच सतर्क झाला. तटकरेंना मत म्हणजे मोदींना मत, याच वाक्याचा धागा पकडून त्यांनी मतदान यंत्रातून आपला विरोध प्रकट केल्याचे बोलले जाते. फडणवीस यांचे हेच वाक्य तटकरेंसाठी डोकेदुखी ठरणार का हे मतदानयंत्र उघडल्यावर समोर येणार आहे. रायगड लोकसभा मतदार संघात एकूण मतदारांच्या तुलनेत एक लाख ६० हजार मुस्लिम मतदार आहेत. हा मतदार या आधी काँग्रेसच्या पाठीशी होता. एक गठ्ठा मतदान होत असल्याने तत्कालीन काँग्रेसच्या उमेदवारांला विजयाची कोणतीच चिंता नसायची. पुढे काँग्रेसने हा मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडल्याने तो त्यांच्यासोबत काही प्रमाणात होता. त्यानंतर रायगडातील तटकरे यांची राष्ट्रवादी भाजपासोबत गेल्याने हाच मतदार तटकरेंपासून दुरवला गेल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे.

### किडरोगाचा आंब्याला धोका

सुरु झाला. फुलकिडी मोहरमधील फुलांचा रस शोषून घेऊ लागले. त्याचा परिणाम आंब्याच्या उत्पादनावर झाला. आंबा यंदा चांगला येईल अशी अपेक्षी शेतकऱ्यांना होती. परंतु आंब्याच्या उत्पादनात प्रचंड घट झाल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

### खोराबंदर जेट्टी पूर्णत्वाच्या मार्गावर

टाईम बोर्डालाही लेव्ही स्वरुपात मेरीटाईम बोर्डाला पर्यटकांच्या माध्यमातून बऱ्यापैकी उत्पन्न ही मिळते. जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी वाहतूक कोंडी होऊ नये व पर्यटकांना व्यस्त कार्यक्रमातून वेळेचे नियोजन करता यावे, म्हणून दिरंगाई टाळण्यासाठी राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदरातून पर्यटकांना किल्ल्यापर्यंत ने-आण करणे कामी जंजिरा पर्यटक वाहतूक संस्था नियुक्त करण्यात आली आहे.

### ईडीला अटकेचे अधिकार नाहीत

आरोपीला जामिनासाठी कठोर दुहेरी परीक्षेला सामोरे जावे लागते का, असे सर्वोच्च न्यायालयात विचारण्यात आले होते. यावर न्यायालयाने ही टिप्पणी केली आहे. जर आरोपी समन्सचे पालन करण्यासाठी विशेष न्यायालयात हजर झाला असेल, तर तो कोठडीत आहे असे मानता येणार नाही, अशा शब्दांत न्यायालयाने ईडीला खडसावले आहे. समन्स बजावल्यानंतर जर आरोपी न्यायालयात हजर झाला असेल तर त्याला जामिनासाठी अर्ज करण्याची गरज नाही आणि पीएमएलए कायद्याच्या कलम ४५ ची दुहेरी अट त्याला लागू होत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

### हॉटेल व्यवसायातील इर्षेतून खून

भानुदास भिवा चौधरी यांची पत्नी व मुलगा यांच्याकडे प्रथमदर्शी विचारपूस केली, असता अशी माहिती मिळाली की, भानुदास भिवा चौधरी (वय, ५४ वर्षे), यांचा वडापाव, चहा विक्रीचे कलोते फाटा येथे हॉटेल व्यवसाय आहे. हॉटेल व्यवसाय करुन ते रात्री ९ वाजण्याच्या सुमारास हॉटेल बंद करून घरी जाण्यास निघाले होते. त्यावेळी भानुदास चौधरी हे पत्नी व मुलास पुढे घरी जाण्यास सांगून स्वतः त्यांच्या हॉटेल मध्येच रात्रभर झोपले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी भानुदास चौधरी यांची पत्नी मुलगा हॉटेल उघडण्यास आले असता भानुदास चौधरी हे हॉटेलमध्ये दिसून आले नाही. म्हणून त्यांनी त्यांचा शोध घेतला असता त्यांचा मृतदेह हॉटेलच्या पाठीमागे साधारण १०० मीटर अंतरावर उंबराच्या झाडाजवळ आढळून आला. भानुदास चौधरी यांच्या हातावर, गळ्यावर झालेल्या जखमांची बारकाईने पाहणी केली असता त्यांच्या मृत्यूबाबत संशय निर्माण झाला. त्यांच्या मरणाचे कारण स्पष्ट होण्याकरीता भानुदास चौधरी यांचा मृतदेह शवविच्छेदनाकरीता जे. जे. हॉस्पीटल मुंबई येथे रवाना केला आहे. शवविच्छेदनामध्ये वैद्यकीय अधिकारी जे. जे. हॉस्पीटल मुंबई यांनी त्यांच्या मरणाचे कारण गळा दाबून मृत्यू असे दिले. यावरुन भानुदास चौधरी यांचा खून केला असल्याचे निष्पन्न झाले. त्यादरम्यान स्थानिक पोलिस ठाणे स्तरावर विविध पथके स्थापन करून गोपनीय माहिती प्राप्त करून, तांत्रिक पुराव्यांच्या विश्लेषणातून विविध संशयीत इसमांकडे सखोल तपास सुरू करण्यात आला. पोलिसांना मिळालेली माहिती व तांत्रिक पुरावे यांच्यावर आधारीत कौशल्यपूर्ण तपासावरून संशयीत इसम नितेश पाटील याने त्याचा सहकारी मारुफ उर्फ मेहबुब हसमत अली, मुळ रा. उत्तरप्रदेश, सध्या रा. कलोते याच्याशी संगनमत करुन भानुदास भिवा चौधरी यांच्याशी असलेल्या हॉटेल व्यवसायाच्या ईर्षेतून गळा दाबून खून केल्याची कबुली दिली. त्यांच्या विरूध्द खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे.

### मित्रानेच केली मित्राच्या मुलाची हत्या

मृतदेह आढळून आला. त्यांनी लगेचच उरण पोलिसांना माहिती दिली. उरण पोलीस पथकानेही घटनास्थळी धाव घेतली. धारदार शस्त्राने हर्ष याचा गळा चिरून हत्या करून मृतदेह खाडीत टाकला असल्याचे आढळून आले. तांत्रिक मदतीने पोलिसांनी संशयित आरोपी कांतारामला पलायनाच्या तयारीत असतानाच ताब्यात घेतले. चौकशीत जुन्या भांडणाचा राग धरून हर्षची हत्या केली असल्याची कबुली कांतारामने दिली.

### नेरळ-जिते गावाला अवकाळीचा फटका

भिजून गेले आहेत. कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नसून मोठ्या प्रमाणात वित्त हानी झाली आहे. नरेश जाधव यांच्या पोल्ट्री फॉर्मचे मोठे नुकसान झाले आहे. पोल्ट्री फार्मवरील पत्रे उडून गेल्याने कोंबडीची पिल्ले यांचा तडफडून मृत्यु झाला आहे.जिते आणि कुंभे येथील घरांचे वादळी वाऱ्याने नुकसान केले आहे. तेथील ३०हून अधिक घरांचे नुकसान झाले असून महसूल विभागाकडून शेतकऱ्यांच्या घरांचे झालेले नुकसान यांचे पंचनामे महसूल खात्याकडून पूर्ण करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांच्या घरांचे कौले तसेच पत्रे उडण्याची या दोन्ही गावांमधील सर्वात मोठी घटना आहे. तेथील रुपेश जाधव, रामचंद्र वळवे, मंगळ मिरकुटे, काळुराम मिरकुटे, रवी हिलम, अनिल भोईर, नवनाथ भोईर, भरत भोईर, संदीप मोरे, राजाराम पवार, गौरू मोरे दत्ता भोईर, नितीन पदारे, नंदू पदारे, गौतम म्हसे, बाळू मिरकुटे, अंकुश मिरकुटे, जगन्नाथ भोईर, बंडू म्हसकर, किंकावन मोरे, तानाजी मोरे, यशवंत म्हसकर, हनुमान मोरे, भगवान जाधव, नामदेव पवार, जिजा पवार, लक्ष्मण हिलम, हिरामण पवार, जनाबाई वाघमारे, मंगेश हजारे, नरेश जाधव, कांताबाई बोराडे, रोहित बोराडे,भगवान मोटे, वसंत म्हसकर, पुंडलिक म्हसकर, कमलाकर जाधव आदी ग्रामस्थांच्या घरांचे वादळी वाऱ्याने नुकसान केले आहे. या नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे केले जात असताना महसूल विभागाचे तलाठी यांच्या मदतीला स्थानिक ग्रामपंचायत सरपंच रोहिणी मिरकुटे यादेखील हजर होत्या.त्यांनी महसूल विभागाकडे नुकसानग्रस्त ग्रामस्थांना तत्काळ मदत मिळावी अशी मागणी केली आहे.

### अज्ञात चोरट्यांनी फोडले एटीएम

बँकेचे एटीएम अज्ञात चोरट्यांनी फोडले.अंधाराचा फायदा घेत एटीएम फोडल्याने येथील स्थानिकांना याची माहिती मिळाली नाही. सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास येथील व्यापारी वर्ग दुकान उघडण्यासाठी आले असता ही माहिती मिळाली. याबाबत नेरळ पोलिसांना माहिती देताच नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे व त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. चोरट्यांनी स्क्रीन बाजूकडील एटीएम मशीन फोडून पैसे काढण्याचा प्रयत्न केला. तर ज्या मशीनच्या भागात पैसे ठेवले जातात. तो भाग चोरट्यांना फोडण्यास जमला नाही.दरम्यान या एटीएममधून चोरट्यांना पैसे न घेताच खाली हात परतावे लागले. शहरात विद्युत पुरवठा खंडित झाल्याने येथील बाजारपेठेतील सीसीटीव्ही कॅमेरे देखील बंद झाले होते. त्यामुळे आता नेरळ पोलिसांसमोर चोरट्यांना शोधून काढणे हे एक मोठे आव्हान असणार आहे. घटनास्थळी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी टी.डी. टेळे यांनी भेट दिली आहे तर अधिक तपास नेरळ पोलीस करीत आहेत.

### नाट्यगृहासाठी कलाकार रस्त्यावर

क्षमतेचे असावे अशी मागणी करण्यात आली आहे. विधीमंडळाच्या अधिवेशनात या नाट्यगृहाच्या पुर्नबांधणीच्या कामाचे पडसाद उमटले. त्यानंतर अधिवेशनात नाट्यगृहाच्या तोडकामाला स्थगिती देण्याची घोषणा करण्यात आली. मात्र, सोशल सर्व्हिस लीगने मे महिन्यापासून पुन्हा तोडकाम सुरू केले आहे. सोशल सर्व्हिस लीगच्या या निर्णयाचा नाट्य परिषदेने तीव्र निषेध केला आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी सांगितले की, हा विषय सामोपचाराने सुटेल अशी अपेक्षा होती, मात्र तसे न होता स्थगितीला न जुमानता तोडकाम सुरू झाले आहे. याविरोधात सोशल सर्व्हिस लीगला पत्र लिहिले जाणार आहे. जर त्यांनी ऐकले नाही तर नाट्यगृह बचावासाठी कलाकारांना घेऊन रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा अभिनेते-निर्माते प्रशांत दामले यांनी दिला आहे. दामोदर नाट्यगृहाची पुनर्बांधणी करताना पूर्वी पेक्षा लहान आणि त्या जागेवर दुसरी शाळेची वास्तू उभारली जात आहे. त्यामुळे नाट्यगृहाच्या चुकीच्या पुनर्बांधणी विरोधात आणि नाट्यगृह मोठं आणि अत्याधुनिक उभाराव, जुन्या संस्थांना, कलाकारांना कार्यालयं द्यावी या मागणीसाठी यापूर्वी सोशल सर्व्हिस लीगने आणि कलाकार मंडळी यांनी आंदोलन केलं होतं. मात्र प्रशासन दाद देत नसल्याने आता कलाकार मंडळी पुन्हा उपोषण करण्याचा तयारीत आहेत.

### मनोज जरांगे यांची सभा रद्द

त्यांची भेट त्यांनी बीडच्या जिल्हा रुग्णालयात घेतली. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. येत्या ८ जून रोजी मनोज जरांगे पाटील यांची बीडमधील नारायणगड येथे सभा होणार होती. त्यासाठी ४०० एकर मैदानावर तयारी सुरु होती. सभेला लाखो मराठा बांधव उपस्थित राहणार होते. राज्य सरकारला धडकी भरवणारी ही सभा असेल, असा दावा आंदोलकांकडून करण्यात येत होता. मात्र पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे ही सभा रद्द करण्यात आली आहे. बीडमध्ये हा जो प्रकार सुरू आहे तो आता निवडणुकीनंतर होणे मला अपेक्षितच होते. मराठा मताची त्यांना गरज आहे, परंतु मराठा समाज बांधवांची नाही. त्यांच्या व्यासपीठावर बसणाऱ्या नेत्यांनी नेत्यांनी ही बाब लक्षात घ्यायला पाहिजे. मलाही आता धमक्या येत आहेत, तुझ्याकडे बघून घेऊ, तुला जीवे मारू, असे म्हटले जात आहे. मला बीडमध्ये पाय ठेवू दिला जाणार नाही, असे देखील म्हटले जात आहे. परंतु मुंडे बहीण-भावाने एक लक्षात घ्यावे मला बीडमध्ये येऊ दिले नाही तर त्यांनाही महाराष्ट्रात फिरायचे आहे. माझा लढा माझ्या समाज बांधवांसाठी आहे. त्यासाठी माझी बलिदानाचीदेखील तयारी असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

**बैठकीत ठरणार सभेची नवीन तारीख**

नारायण गडावरील सभेवर दुष्काळाचे सावट होते. त्या परिरात भीषण दुष्काळ पाहता सभा रद्द करण्यात आली आहे. उन्हाची तीव्रता आणि पाणी नसल्याने सभा रद्द करण्याचा निर्णय मनोज जरांगे पाटील यांनी घेतला आहे. आता मराठा समाजाच्या पुढील बैठकीत सभेची तारीख निश्चित होणार आहे.

निवडक

## कार चालकाला मारहाण

**म्हसळा :** म्हसळा शहरातील शिवकृपा बँकेजवळ कारसमोर असणाऱ्या स्कुल बसला गाडी पुढे घ्या सांगितल्याच्या रागातून स्कुल बस चालक आणि सोबत असणाऱ्या ७ पर्यटकांनी कार चालकाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली. स्कुल बस चालकास बस पुढे करा मला जायचे आहे. अशी विनंती केली असता बस हलविण्यास नकार देऊन शिवीगाळ केल्याप्रकरणी बसचालकावर म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नामयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**खांब :** कोलाड विभाग वारकरी संप्रदायाचे वतीने शुकवार (दि.१७) मे व शनिवार (दि.१८) या कालावधीत दोन दिवसीय अखंड नामयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. द.ग.तटकरे माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज कोलाड येथे संपन्न होणाऱ्या या सप्ताहात पहाटे काकड आरती, सकाळी सर्व मंगलविधी, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण ,दुपारी महाप्रसाद, सायंकाळी साम ुदायिक हरिपाठ, ७ ते ९ हरिकीर्तनरुपी सेवा, महाप्रसाद तद्नंतर सामुदायिक जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

## सृष्टीला मास्टर्स पदवी प्राप्त

**रेवदंडा :** रेवदंड्यातील आदित्य मेडिकल स्टोअर्सचे संदिप खोत यांची स्नुषा सृष्टी आदित्य खोत हिने अमेरिकेतील युनिव्ह युर्निव्हसिटीमधून इन्फरमेशन सिस्टममध्ये मास्टर्स पदवी प्राप्त केली. सृष्टी आदित्य खोत हिने लग्नानंतर उच्चशिक्षणासाठी सासरे संदिप खोत यांच्याकडे इच्छा व्यक्त केली. तिच्या इच्छेनुसार संदिप खोत यांनी तिला पुढील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील बिगहॅमटोन, स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्युयॉर्क या युनिव्हर्सिटीमध्ये उच्च शिक्षणासाठी पाठविले.

## होर्डींग्ज हटविण्याची मागणी

**पनवेल :** खारघर शहरातील गर्दीच्या ठिकाणी असलेले होर्डींग्ज कायमस्वरुपी हटविण्याची मागणी खारघर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमख गुरुनाथ पाटील यांनी पनवेल महानगरपालिकेला दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.या निवेदनात गुरुनाथ पाटील यांनी म्हटले आहे की, मुंबई घाटकोपर येथील दुर्घटनेनंतर लोकांच्या मनामध्ये भितीयुक्त वातावरण आहे. खारघरमधील वर्दळीच्या ठिकाणी मोठमोठे होर्डींग्ज लावण्यात आले असून भविष्यात घाटकोपरसारखी दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

## सामान जळून भस्मसात

**पनवेल :** खारघर सेक्टर २१ येथील शिल्प चौक शेजारील चतुर्भुज इमारतीच्या १४ व्या मजल्यावर अचानक लागलेल्या आगीत घरातील महागडे सामान जळून खाक झाल्याची घटना घडली आहे.येथील इम ारतीच्या १४ व्या मजल्यावर राजीव गंगवार हे वास्तव्य करीत आहेत. ते कामानिमित्त बाहेर गावी गेल्यामुळे घर बंद होते. या बंद घराला अचानकपणे आग लागली. या आगीत घरातील टीव्ही, फ्रिज, एसी व इतर फर्निचर जळून खाक झाले आहे. सिडको अग्नीशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहचून त्यांनी आग आटोक्यात आणली.

# रेल्वेमार्गावरील बोगद्याची कामे पूर्ण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**पनवेल कर्जत रेल्वे मार्गावर मुंबई रेल कॉर्पोरेशन कडून मोठ्या वेगाने कामे सुरू आहेत.२०२५ मध्ये या मार्गावरून वाहतूक सुरू करण्यासाठी मध्य रेल्वेकडून जोरदार हालचाली सुरू आहेत.या मार्गावरील कर्जत हद्दीत असलेले तिन्ही बोगदे यांची कामे अंतिम टप्प्यात आहेत.दरम्यान, मुंबईचे उपनगर म्हणून कर्जत, पनवेलच्या विकासात हा कॉरिडॉर महत्वाचा ठरणार आहे.**




पनवेल-कर्जत उपनगरीय कॉरिडॉरची कामे २०२५ पूर्ण करून या मार्गावरून उपनगरीय लोकल वाहतूक सुरू करण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. या मार्गावर तीन ठिकाणी बोगदे असून त्यातील किरवली बोगदा सर्वात जास्त लांबीचा आहे. त्या तिन्ही बोगद्याची कामे एमआरव्हीसीद्वारे करण्यात येत आहेत. या तीन बोगद्यांचे भूमिगत खोदकाम पूर्ण झाले असून २०२५ मध्ये या मार्गावरील उपनगरीय लोकल सेवा सुरू करण्यासाठी हे कामे महत्वाची ठरत आहेत. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प एमयूटीपी- ३ अंतर्गत पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय कॉरिडॉर प्रकल्प आकार घेत आहे. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रकल्पातील सर्वात लांब बोगद्याच्या पी एक आणि पी दोन या दोन्ही पोर्टल्सच्या उद्घाटनासह कामाला सुरुवात करण्यात आली होती. सद्यस्थितीत पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय कॉरिडॉरमधील मुख्य बोगदा-२ (वावरेली बोगदा) चे २ किमी भूमिगत खोदकाम पूर्ण झाले असून, सध्या वॉटर प्रूफिंग आणि काँक्रीट अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. बीएलटीशी (बॅलास्ट लेस ट्रॅक) संबंधित तयारीची कामे तीपथावर असल्याचे एमआरव्हीसीद्वारे सांगण्यात आले. एकूण ३१४४ मीटर लांबीचे तीन बोगदे या प्रकल्पात समाविष्ट आहेत. यामध्ये २१९ मीटर लांबीचा मुख्य बोगदा-१ (नढळ बोगदा), २६२५ मीटर लांबीचा मुख्य बोगदा-२ (वावरेली बोगदा) आणि ३ मीटर लांबीचा बोगदा ३ (किरवली बोगदा) या प्रकल्पाचा भाग आहे. यामध्ये नढळ बोगद्याचे काम २१ ऑक्टोबर रोजी सुरू झाले आणि १० मे २०२३ रोजी ब्रेक थ्रू प्राप्त झाला. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी २६२५ मीटर लांबीचा मुख्य बोगदा-२ वावरेली बोगदा याचे भूमिगत उत्खनन सुरू होऊन नुकतेच पूर्ण झाले आहे. तर बोगदा-३ म्हणजेच किरवली बोगद्याच्या भूमिगत उत्खननाचे कामही २९ सप्टेंबर २०२३ रोजी सुरू झाले. काहीअंशी हे काम राहिले असून, एकूण तिन्ही बोगद्यांच्या भूमिगत उत्खननात एकूण ७२ टक्के प्रगती आहे. दरम्यान, खोदकाम पूर्ण करण्यासोबत या बोगद्यांमधील ट्रॅक रचना बॅलास्ट लेस ट्रॅकवर असेल. समकालीन आंतरराष्ट्रीय मानकांच्या बरोबरीने सार्वजनिक आश्रय क्षेत्र, बोगदा नियंत्रण प्रणाली, प्रकाश व्यवस्था आणि वायू व्हिजन प्रणाली यासारखी पुरेशी स्मार्ट वैशिष्ट्ये तयार केली जात असल्याचे एमआरव्हीसीकडून जाहीर केले आहे.



## संभाजी महाराजांना अभिवादन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त कर्जत तालुक्यात अभिवादन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा हालिवली येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हालीवली जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र म्हात्रे यांच्या संकल्पनेतून जयंती उत्सवाचे आयोजन केले होते. सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ शिंदे आणि रामदास बोराडे यांच्या सहकार्याने शालेय विद्यार्थी सह गावातून छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची पालखीमधून मिरवणूक काढण्यात आली.यावेळी रामदास बोराडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले. तर काशिनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील माहिती सांगितली.तर शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र म्हात्रे यांनी संभाजीराजे यांच्याविषयी सांगताना त्यांचे पराक्रम, शौर्य याचे अनेक किस्से मुलाना सांगितले. संभाजीराजांचा इतिहास ऐकताना विद्यार्थी इतिहासात रमलेले पहायला मिळाले. दरम्यान स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी राजे भोसले यांच्या जन्मोत्सव पालखी सोहळा आयोजित करण्यासाठी भूषण राणे, प्रमिला दिनकर, वंदना बोराडे, मनिषा बोराडे, अर्चना शिंदे, दर्शना बोराडे तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी यांचा सहभाग होता.

## होम मिनिस्टर कार्यक्रमास प्रतिसाद

**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

महिलांना संघटित करून त्यांच्या सर्वांगिण शाश्वत विकासासाठी मार्गदर्शन करणे, तसेच विविध उपक्रमातून त्यांना प्रोत्साहन देणे या उदात्त हेतूने सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील तिसे ग्रामपंचायत हद्दीतील तळवली येथे होम मिनिस्टर व हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



यावेळी हळदी कुंकू व होम मिनिस्टर कार्यक्रमास महिला वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवला. होम मिनिस्टर स्पर्धेत अनुक्रमे शलाका प्रसाद यांनी प्रथम क्रम ांक, द्वितीय क्रमांक निधी मनोरे, तृतीय क्रमांक प्रतिभा सोनटक्के, चतुर्थ क्रमांक नीता वडे यांनी पटकाविला. विजेत्यांना अनुक्रमे सोन्याची नथ, पैठणी साडी, चांदीचा पैंजण, चांदीचा दिवा आदी बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमास तिसे ग्रामपंचायत सरपंच राकेश कांबळे, उपसरपंच जयेश घावटे, तेजस घावटे, महेंद्र पानसरे, संतोष दपके, वैभव जैतपल, भूषण तेलंगे तसेच महिला वर्गात माधवी तेलंगे, रचना वडे, प्रिती घावटे आदी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल नागोठणेकर, तर आभार माधवी तेलंगे यांनी मानले.

## पांडुरंग तुपकर यांना देवाज्ञा

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील शिरवली गावचे रहिवासी असणारे व सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग सुराजी तुपकर यांना रोजी राहत्या निवासस्थानी देवाज्ञा झाली.त्या समयी ते सुमारे ८० वर्षाचे होते. अतिशय प्रेमळ व सर्वांची अगत्याने विचारपूस करून स्नेह व प्रेमाचे संबंध निर्माण केलेले पांडुरंग सुराजी तुपकर यांनी आपला समाज व आपले गाव यांच्या विकासकामासाठी नेहमीच चांगले योगदान दिले होते. तर वारकरी संप्रदायाचे प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी आपल्या हयातीत चांगले कार्य करून दाखविले. त्यांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अनेक तरूणांना मार्गदर्शन केले होते.



त्यांच्या माध्यमातून परिसरात वारकरी संप्रदाय वाढीस येत होता. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे, भाचे, मेहुणे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी २२ मे रोजी तर अंतिम धार्मिकविधी २५ मे रोजी त्यांच्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली.



**● ज्येष्ठ निरूपणकार निरूपणकार महाराष्ट्र भूषण,पद्मश्री डॉ.दत्तात्रेय नारायण तथा आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख तथा उरण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मनोहर भोईर यांनी तीर्थरूप अप्पासाहेबांची सदिच्छा भेट घेऊन शाल व पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाचे शुभेच्छा दिल्या व आशीर्वाद घेतले. यावेळी रायगड (मध्य) जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, पनवेल तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष राकेश खराडे, उपविभागप्रमुख तथा शिवदुत राजन कडू, माजी शाखाप्रमुख विदेश म्हात्रे, स्वीय सहाय्यक किरण म्हात्रे उपस्थित होते.**

# पनवेलमार्गे मुंबई महानगराला हरित ऊर्जा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मुंबई महानगरात दोन हजार मेगावॅट वीज उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प मुंबई ऊर्जा मार्ग लिमिटेड लवकरच साकारत आहे. पनवेल तालुक्यातील १७ गावांतून हा प्रकल्प मुंबईच्या दिशेने जात आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून मि ळणारी वीज ही हरित ऊर्जा प्रकाराची असल्याने ग्राहकांच्या खिशावरचा भार काही प्रमाणात हलका होणार आहे. गुजरात राज्यातील कच्छम धल्या दोदरा येथे सौरऊर्जा आणि पवन ऊर्जेच्या माध्यमातून निर्माण केली जाणारी वीज मुंबई महानगर प्रदेशाकरिता आणण्याचा उपक्रम ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने हाती घेण्यात आला आहे.

हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी साधारणत दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. वाढलेली विजेची मागणी लक्षात घेता सध्या कार्यान्वित असलेल्या अतिउच्च दाबाच्या वीजवाहिन्या वीज पारेषण करण्यासाठी पुरेशा सक्षम नाहीत. साधारणतः पाच ते सहा दशकांपूर्वी उभारलेले हे वीजवाहिन्यांचे जाळे, दिवसेंदिवस वाढत जाणारी विजेची मागणी त्यामुळे अतिरिक्त वीज आणण्यासाठी या वीजवाहिन्या प्रभावी ठरत नाहीत. यासाठी अतिउच्च दाब वीजवाहिन्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात तयार करणे ही आता वीज कंपन्यांपुढे मोठी गरज बनली आहे.

विजेची वाढती मागणी लक्षात घेता, सरकारकडून विविध उपक्रम राबवण्यात येत असून त्यापैकी हरित ऊर्जा निर्मिती व वापराला प्राधान्य दिले जात आहे.

**गुजरात-पालघर-भिवंडीमार्गे पनवेल**

गुजरातमधून येणारी ऊर्जा वहिनी पालघर, भिवंडी, अंबरनाथ तालुक्यातून पनवेल तालुक्यात प्रवेश करत आहे. पनवेल तालुक्यात टाकण्यात येणाऱ्या एकूण तारांची लांबी २६.५ किलोमीटर आहे. पनवेल तालुक्यातील १७ गावांमधून ही वाहिनी पुढे खारघर केंद्रामध्ये पोहोचते. तालुक्यातील ९५० भूधारकांना टॉवर आणि तारांखालचे एकत्रित क्षेत्रासाठी समाधानकारक परतावा देण्यात आला.

> **मुंबई महानगर प्रदेश झपाट्याने विकसित होत आहे. अखंडित वीजपरवठा ही सुनियोजित विकासाची सगळ्यात पहिली गरज आहे. ज्या प्रमाणात या प्रदेशाचा विकास होतो आहे, ते पाहता येत्या काळात अतिरिक्त विजेची गरज भासणार आहे. सध्याच्या पारेषण प्रणालीमध्ये नव्या अतिउच्च दाब वाहिन्यांची नितांत गरज आहे. त्यामुळे नियोजित प्रकल्पांच्या माध्यमातून अतिरिक्त वीज वाहिन्या उभारून भविष्यात विजेचा हा तुटवडा भरून काढणे सोपे होणार आहे.**
> **- डॉ. संजीव कुमार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत महापारेषण**

## दिव्याचे बारावी परिक्षेत यश

**रसायनी :** चौक वावंढळ गावची दिव्या अविनाश कदम ही सी.बी.एस.ई.बोर्ड परिक्षेत इयत्ता १२ परीक्षेत ९२.४० टक्के गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



चौक वावंढळ या कोयना प्रकल्पग्रस्त गावातील अविनाश विठ्ठलराव व विणा अविनाश कदम यांची दिव्या कन्या आहे. लहानपणापासून शिक्षणाची आवड आहे. वडील अविनाश कदम व आई वीणा कदम यांच्या बरोबर शाळेतील शिक्षकांचा वाटा आपल्या यशात असल्याचे तिने सांगितले. कुमारी दिव्या ही रिलायन्स फाऊंडेशन शाळेची विद्यार्थीनी आहे. वावंढळ गावाला लष्करात मोठा मान प्राप्त करून देणारे कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांची दिव्या नात आहे.

## भूमी कदमला दहावीत ९६.४ टक्के गुण

**रसायनी :** वावंढळ गावची भूमी सुकृत कदमने इयत्ता १० च्या परीक्षेत सी.बी.एस.ई. बोर्ड परिक्षेत ९६.४ टक्के गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



भूमी सुकृत कदम ही खालापूर तालुक्यातील वावंढळ या कोयना प्रकल्पग्रस्त गावची कन्या आहे. वडिल सूकृत कदम व आई सई कदम यांच्या बरोबर शाळेतील शिक्षकांचा आपल्या यशात मोठा वाटा असल्याचे तिने सांगितले. भूमी सुकृत कदम ही विद्यार्थिनी दत्ता मेघे वर्ल्ड अकॅडमी या शाळेची विद्यार्थीनी आहे. वावंढळ गावच्या पंचक्रोशीत वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवणारे आळंदी व पंढरपूर येथे वारकरी संप्रदायांचे दिंडी चालक बाबुरावमहाराज कदम यांची भूमी नात आहे.

## सुरज शेख याचे बारावी परीक्षेत यश

**उरण :** सुरज नूरा शेख याने सीबीएससी बारावी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. तो टी.एस.रहमान, न्हावे या विद्यालयात शिकत होता. कोणताही क्लास न लावता त्याने ८० टक्के गुण प्राप्त केले आहेत. सुरजचे पालक नूरा हसन शेख हे रयत शिक्षण संस्थेत शिक्षक असून ते रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक आणि दी रयत सेवक को ऑपरेटिव्ह बँक, सातारा चे मा. व्हॉईस चेअरमन आहेत. सुरजने या यशाचे श्रेय आपले आईवडील आणि शिक्षकांना दिले आहे. त्यास पुढे कॉम्प्युटर सायन्स या क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घ्यायचे आहे.



क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● सुरभी स्वयंसेवी संस्था अलिबाग ऑफिस कामासाठी मुले/मुली/महिला पाहिजेत. शिक्षण BA, B.Com, Bsc, msw MBA सिविल हॉस्पिटल अलिबागमध्ये स्वच्छता दूत कामासाठी महिला/पुरूष पाहिजेत. संपर्क : ९४२०६४५५७९/९५२७०४०७५० पत्ता : सुरभी स्वयंसेवी संस्था, कलेक्टर ऑफिस समोर अलिबाग

● रायवाडी कॉम्प्लेक्स अलिबाग शहरामध्ये असलेल्या स्टार हेल्थ इन्शुरन्स ऑफिसमध्ये स्टाफ आवश्यक आहे. कम्प्युटरचे ज्ञान अत्यावश्यक, शक्यतो पदवीधर असावा. दोन उमेदवार आवश्यक आहेत. स्त्री-पुरूष कोणीही चालतील, अनुभव असेल तर उत्तम. ९८२२९३८४४४ या नंबरवर रिझ्युम सेंड करावा. त्याप्रमाणे आपल्याला संपर्क करण्यात येईल.

● पिंपळभाट, अलिबाग येथे मेडिकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले पाहिजेत. शिक्षण- १० ते १२ किमान व अलिबागच्या आजूबाजू परिसरातील हव्यात. ९६२३३६६७७८

● पिंपळभाट अलिबाग येथे मेडिकल एजन्सीजमध्ये सेल्समन म्हणून मुले पाहिजेत. (शिक्षण १० ते १२ किमान) (वय २०-३० पर्यंत) ९६२३३६६७७८

● Shop near Alibag ST Stand is for sale 9764548679

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# लाल मिरचीचा ठसका झाला कमी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

उन्हाळा सुरू झाला की महिला मसाला तयार करण्याच्या तयारीला लागतात. वर्षभरासाठी लागणारा लाल मिरचीचा मसाला बनवण्यासाठी आणि मिरची खरेदी करण्यासाठी गृहिणींची बाजारपेठेत लगबग दिसून येते. मागच्या वर्षी लाल मिरचीचे भाव गगनाला भिडले होते; मात्र यावर्षी लाल मिरचीच्या दरात मोठी घट झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. कर्नाटक, हैदराबाद, गुजरातवरून मिरच्या बाजारात दाखल झाल्या आहेत. गेल्या वर्षी पावसामुळे मिरच्या भिजल्या होत्या. त्यामुळे मिरच्यांचे दर वाढले होते व यंदा मिरच्यांची आवक जास्त असल्याने भाव कमी झाले आहेत.



| मिरचीचे दर | गेल्या वर्षी | यंदा |
|---|---|---|
| पत्री | २८० रू. | २४० रू. |
| लवंगी | ३०० रू. | ३६० रू. |
| बेडकी | ३८० रू. | ३२० रू. |
| संकेश्वरी | ३२० रू. | २८० रू. |
| काश्मिरी | ८०५ रू. | ५०० रू. |
| ढोबळी | ९०० रू. | ५५० रू. |

उन्हाळ्यात लाल मिरची खरेदीचा हंगाम असतो. याच काळात नवीन मिरची बाजारात येते. लाल मिरची खरेदी करून तिचे वर्षभर पुरेल एवढे तिखट करून ठेवले जाते. यंदा मात्र तिखट, झणझणीत खाणाऱ्यांसाठी लाल मिरचीचे दर कमी झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. बाजारातून मिरची खरेदी करून ती रखरखत्या उन्हात सुकवून मिरचीचे देठ तोडून ती मिरची दळण्यासाठी बाजारपेठेतील मसाला गिरणीवर नेऊन त्यापासून चवदार असा मसाला बनविण्यात येतो. त्याच म साल्याचा वापर गृहिणी आपल्या चवदार जेवणामध्ये करत असतात. त्याचबरोबर तेजपत्ता, धणे, वेलची, दालचिनी, मिरी, लवंग, जायफळ, शाही जिरा, दगडफूल, खसखस, हिंग, जिरा इत्यादी साहित्य मसाला बनविण्यासाठी वापरल्यास मसाला अत्यंत चवदार आणि स्वादिष्ट होतो. खडा मसाल्याचे दर स्थिर असल्याने महिलांना यातही थोडासा दिलासा मिळाला आहे. रोजच्या जेवणात सर्रास मिरची पावडरचा वापर होत असल्याने ग्राहकांनी ढोबळी आणि काश्मिरी मिरचीचा वर्षभरासाठी लागणारा लाल मिरचीचा मसाला बनविण्यासाठी मिरची खरेदी करण्यासाठी गर्दी केली आहे.

### अवकाळी पावसामुळे नुकसान

**गेल्या वर्षी अवकाळी पावसामुळे मिरचीच्या पिकाला मोठा फटका बसला होता. त्यातच अनेक ठिकाणी गोदामात असलेली लाल मिरचीही पाण्याखाली गेल्याने मोठे नुकसान झाले होते. तेव्हापासून बाजारात लाल मिरचीचे दर वाढण्यास सुरुवात झाली होती; मात्र यंदा चांगल्या उत्पादनामुळे आवक वाढल्याने मिरचीचे दर कमी होत आहेत. घाऊक बाजारात लाल मिरचीच्या दरात किलोमागे ५० ते १०० रुपयांची घट झाली आहे. घाऊकमध्ये दर उतरल्याने किरकोळ बाजारातही दर उतरणीला लागले आहेत.**

# ठेकेदाराकडून समाधानकारक कामे मार्गी लागण्याची चिन्हे

**। माथेरान । वार्ताहर ।**

**माथेरानमधील एक नाविन्यपूर्ण प्रकल्प म्हणून काही दिवसांपासून सांडपाणी मलनि:स्सारणची कामे सुरू आहेत. त्यासाठी नगरविकास खात्याकडून पन्नास कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. माथेरान या सुंदर स्थळासाठी हा एक महत्वकांक्षी प्रकल्प असून याच माध्यमातून येथील सांडपाण्याचा निचरा होऊन हे पाणी पुन्हा सुयोग्य पद्धतीने उपयोगात आणले जाणार आहे.**



या कामात मलनि:स्सारण पाईपलाईन जोडणी करताना विविध ठिकाणी रस्त्यांची खोदाई करण्यात आली आहे. त्यातच काही दिवसांवर पाऊस येऊन ठेपला आहे. अशाच द्विधा मनस्थितीत सुज्ञ मंडळींच्या मागणी नुसार प्रथमतः जिथे जिथे रस्ते खोदले गेले आहेत. त्याठिकाणी पुन्हा एकदा काढलेले क्ले पेव्हर ब्लॉक लावण्यासाठी सुरुवात झाली असून जोपर्यंत खोदलेल्या रस्त्यावर उत्तम प्रकारे क्ले पेव्हर ब्लॉक लावले जात नाहीत. तोपर्यंत कुठेही रस्ते खोदण्यास घेऊ नये असे सूचित केल्यानंतर संबंधित ठेकेदाराने त्याचप्रमाणे कामाला गती देऊन नियोजनबद्ध कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. विशेष म्हणजे कामाच्या सुरुवातीला ज्या त्रुटी लोकांनी निदर्शनास आणून दिल्या आहेत. त्याचा निपटारा करण्यासाठी संबंधीत ठेकेदारानी संपूर्ण लक्ष त्यावर केंद्रित केले असून सद्यस्थितीत कामे चांगल्या दर्जाची होत असल्याने गावाचे हित पाहणाऱ्या मंडळींनी समाधान व्यक्त केले आहे.

> **एसटीपीकामे पूर्ण करण्यासाठी ठेकेदाराला अठरा महिन्यांचा कालावधी दिला आहे. त्यानुसार त्यांनी टिकाऊ कामे कशाप्रकारे होतील याकडे लक्ष वेधले आहे. नगरपरिषदेच्या अभियंत्यांनी सुध्दा कामात काही त्रुटी दिसत असल्यास त्या वेळीच निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. या चांगल्या पद्धतीने होत असणाऱ्या प्रकल्पास कुणीही नाहक आडकाठी आणू नये, आपल्या गावाची ही आवश्यक कामे लवकरात लवकर पूर्ण होऊन अन्य काही विकासात्मक कामे शासनाच्या वतीने कशी येतील यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.**
>
> **वसंत कदम**
> **अध्यक्ष, शिवगर्जना मित्र मंडळ, माथेरान**



## दाभोलकर खूनाच्या निकालाबाबत
# अंनिसची निर्धार सभा

**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या खूनाच्या खटल्याचा निकाल नुकताच आला. मात्र त्या निकालाने सर्वच संवेदनशील नागरिक निराश झाले. प्रत्यक्ष मारेकरी असलेले सचिन अंदुरे, शरद कळसकर यांना जन्म ठेपेची शिक्षा झाली तर विरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर, विक्रम भावे यांची निर्दोष मुक्तता झाली आहे. मारेकऱ्यांना शिक्षा झाली याचे समाधान व्यक्त होत असतानाच सूत्रधार मोकळे राहिले याची खंतही व्यक्त केली जात आहे. ही खंत व्यक्त करणारी निर्धार सभा महा. अंनिस पनवेल शाखेने नुकतीच आयोजित केली होती.

या सभेस प्रमुख उपस्थिती महा. अंनिस राज्य उपाध्यक्ष डॉ. प्रदीप पाटकर, ॲड. तृप्ती पाटील यांची उपस्थिती लाभली. सुरुवातीस महेंद्र नाईक, प्रशांत ननावरे, रोहिदास कवळे, तनुश्री खातू, नाजुका सावंत, पूजा डांबरे यांनी निषेध व निर्धारपर मनोगत व्यक्त केले. ॲड. तृप्ती पाटील यांनी कायद्याचे धोडक्यात विश्लेषण केले. निकालातील समाधानकारक गोष्टी तसेच न्यायालयाने तपास यंत्रणेवर कोणत्या गोष्टींवर ताशेरे ओढले हे स्पष्ट केले. तसेच कोणती कलमे लावली व त्यांचे स्वरूप स्पष्ट केले. डॉ. पाटकर यांनी समाज, कार्यकर्ते यांची मानसिक अवस्था मांडली. गांधींच्या खूनानंतर उमटलेल्या प्रतिक्रिया आणि डॉ. दाभोलकर यांच्या खुनानंतर उठलेल्या प्रतिक्रिया यातला फरक पाहता आपण अधिक विवेकी वागत आहोत असे ते म्हणाले. आपण समाजालाही समजून घ्यायला पाहिजे असे त्यांनी सांगितले. यानंतर राज्य कार्यवाह आरती नाईक यांनी डॉ. दाभोलकर यांच्या खुनानंतरचा प्रवास व या निकालाविषयी संघटनेची भूमिका मांडली. अल्लाउद्दीन शेख यांनीही आपले मत मांडले. चार युवा कार्यकर्त्यांनी हिंसामुक्त समाजासाठी प्रत्येकी एक संकल्प मांडला. तो संकल्प प्रत्येकाने केला. या सभेस अल्लाउद्दीन शेख, प्रवीण जठार, नवी मुंबई कार्याध्यक्ष अशोक निकम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# मतदान केल्याविना परत जाणार नाही

**। कर्जत । वार्ताहर ।**

मूळचे कर्जतचे रहिवासी आणि सध्या मुंबईत वास्तव्य असलेले ज्येष्ठ नागरिक प्रभाकर अडावदकर यांचा मतदानाचा निर्धार तरूणांनाही लाजवणारा होता. १३ मे रोजी मतदान करण्यासाठी अडावदकर काका (वय वर्षे- ८६) त्यांचा मुलगा दिनेश व सून अर्चना यांच्याबरोबर दुपारी कर्जतला येण्यास निघाले.

मात्र, वाटेत वादळी वाऱ्यासह धुंवाधार पावसाने थैमान मांडले होते. सर्वत्र काळोख दाटून आलेला होता चौक कर्जत रस्त्यावर या वादळी वाऱ्यात एक वाळलेले झाड त्यांच्या गाडीसमोर पडल्याने मोठ्या अपघातातून हे सर्वजण बचावले पण हे सर्व जण मतदान बंद होण्यापूर्वी मतदान केंद्रावर पोहोचले. मतदान केंद्र असलेल्या भिसेगाव मराठी शाळेबाहेर किमान गुडघाभर पावसाचे पाणी भरले होते. पावसाची कल्पना नसल्याने सोबत छत्री वगैरेही नव्हती. अशा परिस्थितीत आता आपण परत जावे असे कुटुंबीय व आसपासच्या लोकांनी सुचवण्याचा प्रयत्न केला पण काकांनी, 'असे कित्येक पाऊस पाहिलेत हो. पाऊस कमी झाल्यावर जाऊ आत. पण मतदान केल्याशिवाय मी आता परत जाणार नाही' असे अडावदकर यांनी ठामपणे सांगितले.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड )
ज. म. र अर्ज ३८/२०२४

**जाहिर नोटीस**

निशात अब्दुल समद बांगी,
रा. मु. दत्तवाडी मुरूड, — अर्जदार
पो. ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मजगांव, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार निशात अब्दुल समद बांगी, यांचा जन्म दिनांक २४/०६/१९७९ रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे मजगाव, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मजगाव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार निशात अब्दुल समद बांगी, यांचा दिनांक २४/०६/१९७९ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. ११/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.१३/०५/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा,**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या मिळकती, मिळकतीचे खालील विद्यमान मालक यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे-खडसांबळे, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| श्री. अमर महादेव चोरगे वगैरे १, रा. खडसांबळे, ता. सुधागड | १३/८ | १-०५-०० | ०.२५ |
| सौ. लक्ष्मी दत्ताराम कोंडे वगैरे ५ रा. खडसांबळे, ता. सुधागड | १८/२/क | ०-७२-०० | ०.२० |
| | १८/६/क | ०-५५-५० | ०.१७ |
| श्री. गौरव शैलेश शहा रा. पाली, ता. सुधागड | १८/६/ब | ०-५४-०० | ०.१७ |
| श्री. सतिश सुरेश शिंदे वगैरे १ | १८/२/ब | ०-७२-५० | ०.२२ |
| रा. पाली, ता. सुधागड सौ. छाया संतोष मगर रा. भांडुप, मुंबई ता. सुधागड | २०/१/ब | १-६१-०० | ०.४९ |
| | १९/१/अ | ०-८४-३० | ४.१९ |
| | १९/१/ब | ०-४१-०० | ७.०० |
| | १९/२ | ०-७३-०० | ७.०९ |
| | २०/४/ब | ०-८०-०० | ०.२१ |
| श्री. नथुराम हनुमंत बेलोसे वगैरे १० | ११/२ अ | ३-३४-०० | ०.७० |
| | १३/१० | ०-६१-०० | ०.२५ |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १९/०५/२०२४

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सदर नोटीसीने सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता अलिबाग खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकती विद्यमान मालक १. लिला गणपत आंबेतकर, २. तुकाराम गणपत आंबेतकर, ३. महेंद्र गणपत आंबेतकर, रा. चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून विकसित करण्याकरिता घेण्याचे ठरविले आहे. तसेच मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याचे कळविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ८/ब/३ | ३-०६-०० | ३०.६० |
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ८/ब/४ | २-९३-०० | २९.३० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.१७.०५.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयाजवळ अलिबाग,
ता. अलिबाग जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक श्री. अशोक भास्कर गोतावडे, रा. गोंधळपाडा, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील बिनशेती मिळकत आमचे पक्षकार यांना कायम स्वरूपी विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा | २/अ/१पै/२८ | ०-९०-०० | ९.०० |

तरी वरील बिनशेती मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताया, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, पायवाट अथवा अन्य प्रकारचा कायदेशिर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहित धरून त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दि. १६/०५/२०२४

सही/-
**ॲड. जयंत मारूती धोदरे**
**प्रिमिअर पार्क**

# चांभार्ली येथे ऑनलाईन फसवणूक

**रसायनी :** ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करून फसवणूक करण्याचा प्रकार रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये चांभार्ली येथे घडला असून याबाबत रणधीर रावसाहेब पाटील यांनी आरोपी इषानी ठाकूर, कार्तिक शेट्टी यांच्या विरोधात ऑनलाईन पैसे फसवणुकीबाबत तक्रार दाखल केली आहे.

रणधीर पाटील यांना अनोळखी व्हॉटसअप नंबर ६२६३६९४५७८ या मोबईल नंबरवरील इसमाने फिर्यादी यांना विश्वासात घेवून फाईव्हस्टार हॉटेलला कमेंट व रेटींग केल्याबद्दल मोबदला देतो असे सांगून काही टास्क पूर्ण करण्याकरिता फिर्यादी यांना इषानी ठाकूर हिने १ हजार रूपये ऑनलाईन ट्रान्सफर करून सदर रक्कम पुन्हा परत मिळविण्याकरिता शेट्टी नावाच्या इसमाने त्यांनी दिलेला युपीआय व पॅन खात्यावर रावसाहेब पाटील यांच्याकडून १ लाख ६६ हजार ७०० रूपये टप्प्याटप्प्याने ऑनलाईन ट्रान्सफर करून घेतली.

**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
**खुली ई-निविदा मागविणारी सूचना दिनांक 17.05.2024**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरीद्वारा खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **कामाचे नाव:** एईएन/चिपळूण विभागांतर्गत नातूवाडी बोगद्याच्या आत साईड ड्रेनमध्ये सुधारणा. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-07). **अंदाजे मूल्य:** ₹ 20,99,276/- **ईएमडी:** ₹ 42,000/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 10/06/2024** रोजी **15.00 वा.** अधिक माहितीसाठी क्षेत्रीय रेल्वे व्यवस्थापक, कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी कार्यालयाशी संपर्क करा. (**संकेतस्थळ: https://www.ireps.gov.in)**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता मुरूड, जि. रायगड)
ज.म.र.अर्ज ४०/२०२४

**जाहिर नोटीस**

श्री. सुशिल देवराम कांबळे,
रा. मु. विरजोळी, — अर्जदार
ता. रोहा, जि. रायगड.

विरुद्ध

मा. मुख्याधिकारी,
नगरपरिषद मुरूड, — सामनेवाला
ता.मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांची मुलगी आर्या सुशिल कांबळे, हिचा जन्म दिनांक २९/०७/२०१३ रोजी ग्रामीण रुग्णालय मुरूड, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद मुरूड कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांची मुलगी आर्या सुशिल कांबळे, यांचा दिनांक २९/०७/२०१३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि ११/०६/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.१३/०५/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे )**
**तहसिलदार मुरुड जंजिरा,**

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मोजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील नगर भुमापन क्रमांक ४९, क्षेत्र १२६.८५ चौ. मी. ही गावठाण जमिन मिळकत व त्यावरील सहाण ग्रुप ग्रामपंचायत कडील घर क्र. ३४, क्षेत्र ११२६ चौ. फूट ही घर मिळकत, श्रीमती सुभांगी हरिश्चंद्र कवळे व श्री. सुयोग हरिश्चंद्र कवळे, राहणार सहाण, ता. अलिबाग, यांच्या मालकीची असून, सदरील घर मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बयाणापावती सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाली आहे. सदर मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक १६/०५/२०२४.

सही/
**(ॲड. निवास ना. पाटील)**
''श्रीक्षेत्र'' सहाण,
ता. अलिबाग, जि. रायगड.
खरेदीदाराचे वकील
मो.नं.९८२२९२८३२७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्रीमती. वंदना महेश बांबळे, रा. आई अपार्टमेन्ट, रूम नं. २०२, २ रा मजला कोहजगाव, राम मंदिर समोर, सिंग पॅराडाईज जवळ, अंबरनाथ पश्चिम-४२१५०१ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे-पोटल, ता. कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ३६ | ३/अ | एकुण क्षेत्र ०.७२.६० पैकी वासुदेव धोंडु बडेकर यांचे मालकीचे ०.२०.०० गुंठे क्षेत्र | ६.१२<br>१.८६ |

तरी वरील मिळकती बाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या तकारी/ हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

तारीख :- १७/०५/२०२४

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता- प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो. नं. ८४४६१४८७८१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मुशेत, ता. अलिबाग येथील गट नं. १११/अ/५, एकूण क्षेत्र ०-५४-१५ हे.आर., आकार ५.२९ रू. पै. ही मिळकत, तसेच या मिळकतीवरील ग्रामपंचायत मापगांव १) घर नं. ७५४ २) घर नं. २८९/१ व ३) घर नं. २८९/२ या मिळकतींसह या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. यासीम दाउद आगबोटवाला रा. मु. मुशेत, पो. मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १६/०५/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सदर नोटीसीने सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता अलिबाग खालील वर्णनाची बिनशेती मिळकत विद्यमान मालक १. जयश्री बबन पाटील, २. बबन यशवंत पाटील, रा. नवीन पनवेल, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ९०/१/क/६ | ३-९६-०० | ३९.६० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १७.०५.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयाजवळ अलिबाग,
ता.अलिबाग जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हुमगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींचे मालक विश्वनाथ रघुनाथ कराळे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २३/२ | ००-६८-०० हे. आर. पा. या एकुण क्षेत्रापैकी ००-२०-०० हे. आर. पॉ. इतक्या क्षेत्राची विश्वनाथ कराळे यांचे मालकीची मिळकत | ०३-४९ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : -
१६ मे २०२४

**ॲड.शरद आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी (१) श्री. किरण भगवान म्हात्रे, (२) श्री. संतोष भगवान म्हात्रे, (३) सौ. सुरेखा जयेंद्र ठाकूर, (४) सौ. हर्षदा हरेश म्हात्रे, (५) सौ. संगिता किरण घरत, (६) सौ. दिपाली दिपक माळी, (७) श्री. गिरीष भगवान म्हात्रे आणि (८) सौ. शंकुंतला भास्कर म्हात्रे यांच्याकडून त्यांच्या मालकी हक्कातील मौजे गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क. /उपविभाग क. | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | जिरायत | लागवडीस अयोग्य | एकूण क्षेत्र | रु. पैसे |
| ३२१/२/अ | ०-१९-८० | ०-०१-२० | ०-२१-०० | ३.७० |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमिन मिळकतीसंदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि वर उल्लेखित जमिन मालक/ भोगवटादार यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरच्या मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतींवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरची जमिन मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदर जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

सही : **धनंदा प्रदिप मोकल**
(उच्च न्यायालय वकील)
पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१,
सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे.
मो. नं. ९६१९५०५९५८

